CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ ⏮ वर्ष – ३ रे ⏮ अंक ३०९ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/–

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या विशेष 'इमर्जन्सी लँडिंग' सुविधेची सुरुवात





**गुवाहाटी/वृत्तसंस्था:** यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आसाममध्ये राजकारण तापले आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. याच पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान मोदींचा आसाम दौरा महत्वाचा ठरत आहे.पंतप्रधान मोदी यांनी या आसाम दौऱ्यादरम्यान ब्रह्मपुत्र नदीवर बांधलेल्या कुमार भास्कर वर्मा पुलाचे उद्घाटन केले. हा पूल गुवाहाटीला उत्तर गुवाहाटीशी जोडतो. हा ईशान्य भारतातील पहिला विस्तारित पूल आहे.

तसेच शनिवारी आसाममधील मोरन बायपासवर कडक उन्हात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्येकडील पहिल्या आपत्कालीन लँडिंग सुविधेचेही उद्घाटन केले. पंतप्रधान मोदींनी भारतीय हवाई दलाच्या सी–१३०जे या विमानातून ऐतिहासिक लँडिंग करून या सुविधेचे उद्घाटन केले. त्याचवेळी, भारतीय हवाई दलाच्या सुखोई एसयू–३० एमके आयने दिब्रुगडमधील मोरन बायपासवरील आपत्कालीन लैंडिंग सुविधा (ईएलएफ) वरून उड्डाण केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपस्थित असलेल्या इतरांनी टेकऑफ पाहिले.

तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी दिब्रुगडमधील मोरन बायपासवरील आपत्कालीन लैंडिंग सुविदेवर उतरले. पंतप्रधान नरेंद्र मोदी सी–१३०जे सुपर हरक्यूलिस विमानातून ईएलएफमध्ये उतरले तेव्हा तो एक ऐतिहासिक क्षण होता. त्यानंतर त्यांनी लढाऊ, वाहतूक विमाने आणि हेलिकॉप्टरचा एअर शो पाहिला. ईशान्य भारतातील अशा प्रकारची ही पहिलीच सुविधा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्याच्या बांधकामामुळे आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानांचे लैंडिंग आणि टेकऑफ करणे सोपे होणार आहे.

आपत्कालीन लँडिंग सुविधा (एडत्र) ही युद्ध आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी एक पर्यायी धावपट्टी सुविधा आहे. युद्ध किंवा आपत्कालीन परिस्थितीत लढाऊ विमाने, वाहतूक विमाने आणि हेलिकॉप्टरसाठी पर्यायी लँडिंग साइट प्रदान करण्यासाठी महामार्गावर एक पट्टी बांधली जाते. ही सुविधा म्हणजेच एडत्र ४० टन वजनाचे लढाऊ विमान आणि ७४ टन पर्यंत जास्तीत जास्त टेकऑफ वजनाचे वाहतूक विमान हाताळण्यास सक्षम आहे.

देशभरात २८ एडत्र ची योजना आहे. सध्या, आसाम वगळता देशात अशा पाच सुविधा आहेत. आसाममधील ही सुविधा देखील महत्त्वाची आहे कारण ती चीन सीमेजवळ आहे. जी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

## राज्य सरकारच्या मोठा निर्णय! १ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १४ फेब्रुवारी :** राज्यसरकारकडून एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता पहिले ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार आहेत. सविस्तर माहितीनुसार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येणार आहे. यासाठी १६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत ही दप्तरं पुरवण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने म्हटले आहे.ही योजना 'विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे' या विद्यमान योजनेंतर्गतच राबवली जाणार आहे. दप्तर हे शैक्षणिक साहित्याचा भाग असल्याने त्यासाठीचा खर्च संबंधित निधीतूनच करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे.






CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरचा महादेव येमले बनला वर्ग- १ अधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** जिद्द आणि चिकाटी असेल, तर यश दूर नसते, या उक्तीला साजेसा प्रेरणादायी प्रवास करत हिप्परसोगा (ता. जि. लातूर) येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र महादेव काशीबाई विठ्ठलराव येमले यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या (MPSC) 2024-25 राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून क्लास-१ अधिकारी पद मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महादेव येमले यांचे प्राथमिक शिक्षण लातूर येथील ज्ञानेश्वर विद्यालयात झाले, तर माध्यमिक व पदवीचे शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालयात पूर्ण झाले. पुढे त्यांनी पुणे येथील गडझच् कॉलेजमधून MBA केले. शासकीय सेवेत अधिकारी बनण्याच्या ध्यासाने त्यांनी MPSCच्या अभ्यासाला सुरुवात केली.

अत्यंत सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या महादेव यांनी कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय स्वतःच्या अभ्यासावर विश्र्वास ठेवून अथक परिश्रम केले. या संघर्षमय प्रवासात त्यांचे मामा तुळशीराम कोयले यांनी आर्थिक पाठबळ देत त्यांना खंबीर साथ दिली. अनेक वेळा मुख्य परीक्षा देऊनही अपेक्षित यश मिळाले नाही, मात्र त्यांनी हार न मानता अभ्यास सुरूच ठेवला. अखेरीस त्यांच्या अथक मेहनतीचे फळ मिळाले आणि नुकत्याच जाहीर झालेल्या राज्यसेवेच्या निकालात MF-S/C-FO पदासाठी त्यांची क्लास-१ अधिकारी म्हणून निवड झाली.



## विविध वृत्त...

### सदानंद माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**लातूर:** श्री सदानंद माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. तसेच प्रभाग १५ मधील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. आर. के कुलकर्णी होते. यावेळी नगरसेवक प्रवीण कस्तुरे, दीपक मठपती, प्रेरणा होनराव, शीला पाटील, मुख्याध्यापक सतीश हलगरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. कुलकर्णी म्हणाले, आजचे युग स्पर्धेचे आहे. केवळ गुणवत्तेच्या आधारावर नव्हे तर नैतिक मूल्यांच्या भक्कम पायावर खरे यश उभे राहते, असे सांगितले. नगर-सेवक कस्तुरेंनी शिक्षणासंबंधी पायाभूत सुविधा, शैक्षणिक गरजा व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक त्या अडचणी दूर करण्याचे आश्र्वासन दिले. मुख्याध्यापक हलगरकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्र्वास व शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर यावर्षीही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखण्याचे आवाहन केले. दहावीचे विद्यार्थी संगम मद्रेवार, प्राप्ती पाटील, वेदपाठक कुशी, श्रीशा बानाटे, श्रावणी बिराजदार, क्रांती वालिंग्रे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षक शिवकांत खुंटेगावे यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन उंबरगेकर, मोरे यांनी तर आभार पेद्दे यांनी मानले.

### शेतकरी साहित्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. ज्ञानदेव राऊत यांची निवड

**लातूर :** दि. २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी महाबळेश्र्वर येथे होणाऱ्या १४ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शेती साहित्य अभ्यासक तथा समीक्षक डॉ. ज्ञानदेव राऊत यांची निवड करण्यात आली आहे. ही माहिती शेती अर्थप्रबोधिनीचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे व संमेलनाचे संयोजक अॅड. सतीश बोरूळकर यांनी पत्राद्वारे कळविली आहे. डॉ. ज्ञानदेव राऊत हे किल्लारी (जि. लातूर) येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयात गेल्या दोन दशकांपासून मराठी विभागात कार्यरत आहेत. मराठी साहित्य व शेतकरी चळवळ हा त्यांच्या अभ्यास, संशोधन व चिंतनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. शेतकरी चळवळीची कौटुंबिक पार्श्र्वभूमी लाभल्यामुळे डॉ. राऊत यांचे लेखन अधिक वस्तुनिष्ठ व जी-वनाशी निगडित झाले आहे. नियतकालिके व दैनिकांत त्यांचे समीक्षात्मक लेखन प्रकाशित झाले. शेतकरी संघटना आणि मराठी साहित्याचे अनुबंध' हा त्यांचा संशोधनग्रंथ साहित्यक व अभ्यासकांमध्ये विशेष चर्चिला गेला आहे. महाबळेश्र्वर येथे होणाऱ्या या महत्त्वाच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. राऊत यांची निवड झाल्याबद्दल डॉ. कुसूमताई मोरे, सुधाकरराव शिंदे, डॉ. संजय मोरे, डॉ. बी. टी. देशमुख, डॉ. महेश मोटे, डॉ. डी. पी कांबळे, दत्ता राऊतराव, प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी सत्कार केला. या निवडीबद्दल डॉ. शेषराव मोहिते, प्रा. फ. म. शहाजिंदे, सुरेंद्र पाटील, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. जयद्रथ जाधव, योगिराज माने, डॉ. दुष्यंत कटारे, देवीदास सौदागर, अनंत कदम, डॉ. संभाजी पाटील, रामदास कांबळे, डॉ. संजय वाघमारे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ. रणजित जाधव, कवी राजेंद्र माळी, राहुल लोंढे आदींनी अभिनंदन केले आहे.

### 'आरोग्य स्वराज्य' मिळवण्यासाठी जीवनशैलीमध्ये बदल करा

**लातूर :** आजची आरोग्यव्यवस्था - काचेच्या खिडकीत ठेवलेल्या महागड्या वस्तूंसारखी झाली आहे. ती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात - असून, उपचार घेतले तर - आर्थिक मृत्यू आणि नाही घेतले तर वैद्यकीय मृत्यू, - अशी भयावह स्थिती निर्माण झाली आहे. अशा - काळात रोगांवर खर्च करण्यापेक्षा 'आर-ोग्य स्वराज्य' संकल्पना राबवून स्वतःच्या जीवनशैलीवर नियंत्रण - मिळवणे, हाच शंभर वर्षे निरोगी जगण्याचा एकमेव मार्ग आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक तथा विचारवंत डॉ. अभय बंग यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ - व्याख्यानमालेच्या वतीने लातूरमधील श्रीकिशन सोमाणी विद्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

## वंदे मातरम् ला राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येकाची : बावस्कर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** रवींद्रनाथ टागोर यांनी जन - गण - मन ऐ-वजी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची रचना असलेल्या वंदे मातरम् ला राष्ट्रगीत करा असे म्हटले होते. रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा प्रवास राहिलेल्या वंदे मातरम् ला आता राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी केले.





डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला २०२६ चे तृतीय पुष्प शुक्रवारी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी ' वंदे मातरम् - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन ' या विषयावर गुंफले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे चे कुलसचिव डॉ. अमित शेष हे उपस्थित होते. मंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, सौ. प्राजक्ता सरदेशमुख, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्राचार्य डॉ. रवींद्र शेंडगे,सुधीर धुतेकर, एस.डी. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. उपस्थितांना अगदी मंत्रमुग्ध करताना पार्थ बावस्कर यांनी वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीची पार्श्र्वभूमी सविस्तरपणे विशद केली. वंदे मातरम् या राष्ट्रगीताने अनेक राष्ट्रभक्त निर्माण केल्याचे सांगताना त्यांनी वास-ुदेव बळवंत फडके, चंद्रशेखर आझाद, मदनलाल धिंग्रा, सूर्यसेन, अल्लुरी राजू, कनकलता बहुआ, मातंगिनी हजरा , तुळेश्र्वरी देवी अशा अनेक क्रांतिवीरांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वंदे मातरम् साठी प्राणांचे बलिदान दिल्याची माहिती पार्थ बावस्कर यांनी अनेक क्रांतिकारकांची उदाहरणे देऊन दिली.

वंदे मातरम् या शब्दाने ब्रिटिशांना अक्षरही सळो की पळो करून सोडले होते. वंदे मातरम् ला ब्रिटिशांनी भारतीयांच्या मनातून काढण्याचा प्रयत्न केल. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. वंदे मातरम् ची विद्या-र्थी दशेतच प्रेरणा मिळाल्याने रा. स्व. संघाचे आद्य संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांच्यासारखे राष्ट्रप्रेमी युगप-ुरुष या भारतमातेला मिळाले. त्याकाळी ब्रिटिशांना आवरण्याचा मोठा लढा बंगालमधील संतांनी दिला होता, याचे स्मरणही त्यांनी करून दिले. वास-ुदेव बळवंत फडके यांनी स्वतःला राष्ट्र कार्यात झोकून देण्यामागची वास्तव-ताही बावस्कर यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली. रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण वंदे मातरम् जा-हीरपणे गायले होते,असेही त्यांनी सांगितले. वंदे मातरम् चा जयघोष करत असंख्य राष्ट्रभक्तांनी मृत्यूला कवटाळल्याचे सांगताना पार्थ बावस्कर यांचा कंठ भरून आला.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी वंदे मातरम् ला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली नव्हती. आता त्याच क्रांतिकारी गीताचा प्रवास रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा सुरु झाल्याचे त्यांनी गौरवाने नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. गोळवलकर गुरुजींच्या अतुलनीय कार्याची माहिती विशद करताना त्यांनी गुरुजी ज्या भागात प्रवास करत असत एकाच भाषेत बौद्धिक देत असल्याचे सांगताना गुरुजींना कधीही भाषेची चणचण जाणवली नसल्याचे नमूद केले. वंदे मातरम् ला त्याकाळी क्रांतिकारकांचा रक्तयज्ञ असेही संबोधले जात असल्याचे सरदेशमुख यांनी सांगितले.

प्रा. शरद पाडे यांनी वंदे मातरम् गौरव गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रल्हाद माले, राजश्री कुलकर्णी यांनी केले. डॉ. वृषाली देशमुख यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ग्रंथालये केवळ शांत बसण्याची जागा न राहता स्टार्टअप्सचे केंद्र बनावे : डॉ. सुरेश जंगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** दे-शातील कोणत्याही व्यवस्थेचा ग्रंथालय हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे काळानुरूप होणारे बदल स्वीकारून ग्रंथालयाला अद्यावत ठेवण्याचा दृष्टिकोन ग्रंथपालाने ठेवला पाहिजे तसेच ग्रंथालये केवळ शांत बसण्याची जागा न राहाता स्टार्टअप्सचे केंद्र बनावे, असे प्रतिपादन गुलबर्गा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. सुरेश जंगे यांनी केले,

शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या येथील राजर्षी शाहू महाविद्यालयमध्ये 'ग्रंथालयांची पुनर्रचनाः पारंपरिक आणि आधुनिक ग्रंथालयाचा समन्वय' या विषयावर ग्रंथालय विभागामार्फत, प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. सुरेश जंगे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील हो-ते. यावेळी प्राचार्य डॉ. महादेवगव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. सावित्री कृष्णा, डॉ. शिवशंकर घुमरे व ग्रंथपाल प्रा. सूर्यकांत मस्के हे होते. पुढे बोलताना डॉ. सुरेश जंगे म्हणाले की, ग्रंथालय केवळ स्मार्ट असून चालत नाही, तर ग्रंथपालाने स्मार्ट असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी त्यांनी नव-नवीन आव्हानांचा स्वीकार करून वर्ल्डकॅट, गुगल बुक्स आणि विकिपीडिया सारख्या विविध संसाधनाचा उपयोग अधिक प्रमाणात केला तर ग्रंथालये हे केवळ शांत बसण्याची जागा न रा-हता, ते संशोधक आणि स्टार्टअप्सचे केंद्र बनल्याशिवाय राहणार नाही असा आशावाद याप्रसंगी त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सूर्यकांत मस्के यांनी केले. आभार सहाय्यक ग्रंथपाल स्वाती सावंत यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. कृष्णा देशमुख यांनी केले.

## जागतिक रक्तक्षय दिनानिमित्त जागरुकता कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** जागतिक रक्तक्षय जागरूकता दिनानिमित्त इंडियन काडमी ऑफ पिडीयाटीक्स, शाखा लातूर व त्री रुग्णालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री रुग्णालय, लातूर येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ. सुरेश भट्टड, त्री रुग्णालय लातूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रविंद्र भालेराव, आयएपी लातूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. विद्यादेवी कांदे, सचिव डॉ. किरण होळीकर, सहसचिव डॉ. संगीता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. महेश डाके, डीईआयसी चे प्रमुख डॉ. अशोक धुमाळ, डॉ. शिवशंकर नागापुरे, डॉ. क्रांती कापसे तसेच स्त्री रुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. कांदे यांनी रक्तक्षयाची कारणे, लक्षणे, परिणाम आणि उपचार माहिती देत योग्य वेळी निदान व उपचार घेतल्यास रक्तक्षयावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. डॉ. होळीकर यानी रक्तक्षय प्रतिबंधासाठी संतुलित व पौष्टिक आ-हाराचे महत्त्व अधोरेखित करीत लोहयुक्त आ-हार, हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये, फळे यांचा नियमित करावा असे आवाहन केले. तर डॉ. नागापुरे यांनी रक्तक्षयमुक्त भारतासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन समाजाने रक्तक्षय निर्मूलनासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ नुकताच उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना विद्यालयात आपल्याला शिक्षणासोबतच जीवनात यशस्वी कसे व्हायचे ? याचेही शिक्षण मिळाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोक गानू उपस्थित होते. यांच्या हस्ते डॉ. गानू यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शालेय सराव परीक्षेमध्ये बक्षिसपात्र ठरलेल्या समर्थ कल्याण गिरवलकर , कु.समृद्धी वैभव पाटील, अथर्व संतोष मरे , साईनाथ अनिल चामे यांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. तसेच अभिनव गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने समर्थ गिरवलकर, अथर्व मरे यांचाही डॉ. अशोक गानू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. अशोक गानू यांनी विद्यार्थ्यांना तुम्हाला तुमच्या मनाप्रमाणे चांगले शिक्षण मिळालं आहे. पण आजूबाजूला असे अनेकजण आहेत, ज्यांच्यात गुणवत्ता असूनही मनातल्या गोष्टी करायला मिळत नाहीत. अशी व्यक्ती तुम्हाला भेटेल तेव्हा त्या व्यक्तीला कमी लेखू नका. जमेल तसे साह्य करा. तुमच्यामध्ये एखादी कला असेल तर तिची जोपासना करा.







शाळेतील विविध अनुभव, इथं मिळालेलं ज्ञान, माहिती याचा विसर पडू देऊ नका असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना सर्वंकष शिक्षण देण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी अग्रक्रमाने शिकवण्यात येत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी आज अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी भविष्यात मागेच राहतील असे नाही, जीवनात शालेय जीवनात किती टक्के मार्क मिळाले यापे-क्षाही तुम्ही जीवन किती चांगल्या प्रकारे जगता, इतरांशी कसे वागता हे महत्व-ाचे असते असे सांगितले. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासासोबतच एक समाजात आदर्श नागरिक म्हणून जगण्याची शिकवणही दिली जात असल्याचे स्वामी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांपैकी कु. अपूर्वा झुंजे, कु. नबिहा इनामदार, कु.श्रावणी शे-ळके, कु. समृद्धी पाटील, कु. समीक्षा मेदगे , कु. ईश्र्वरी पाटील, अथर्व मरे, समर्थ गिरवलकर यांनीही आपले मनो-गत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उत्तरा शहरकर यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका सुनीता जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव राहुल पांचाळ यासह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## श्री सिध्देश्वर यात्रे निमित्त मंदिर परिसरातील काही ठिकाणच्या रोडवरील वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १४ फेब्रुवारी :** लातुर शहरात दिनांक १५/०२/२०२६ रोजी पासून श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या ७३ व्या महाशिवरात्री निमित्त यात्रा भरते व मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा होते. सदर यात्रे करीता लातूर शहरातून, जिल्हयातून व इतर जिल्हयातून नागरिक मोठया प्रमाणात येतात. यात्रेला येणारे वाहनांमुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी निर्माण होवू नये म्हणून मंदिर परिसरातील खालील ठिकाणाहून मंदिराकडे येण्यासाठी वाहनांवर बंदी घालणे आवश्यक आहे.



लोकांच्या दळणवळणानिमीत्त त्यांना विविक्षीत ठीकाणी पोहचणेसाठी सदरची अडचण लक्षात घेता दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत खालील मार्गावर वाहतुक तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे. दिनांक १५/०२/२०२५ रोजीचे ००.०१ ते यात्रा संपेपर्यंत वाहतुकीस बंद असणारे मार्ग १) रिंग रोड मार्गे मळवटी चौकाकडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे मळवटी चौकापर्यंत येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

२) गांधी चौक, हत्ते कॉर्नर, सिध्देश्वर चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे सिध्देश्वर चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

३) शाहु चौकाकडून ६० फुटी रोड, अब्दुल कलाम चौक मार्गे मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे अब्दुल कलाम चौकापर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा

४) बरकत नगर कडून मंदिर परिसरात यात्रेकडे येणारे सर्व वाहने (दुचाकी वगळून) हे बरकत नगर कॉर्नर पर्यंतच येतील तेथून पुढे येण्यासाठी प्रतिबंध करावा तरी सर्व नागरीकांनी उक्त आदेशाप्रमाणे वाहतुकीसाठी बंद असल्याचे घोषित करण्यात आलेल्या मार्गाचा वापर न करता पर्यायी मार्गाचा वापर करुन महानगरपालिका व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.



## संक्षिप्त वृत्त...

### धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकीत इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** सन २०२१-२२ पासून राज्य शासनाकडून धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकीत निवासी शाळांमध्ये मोफत शिक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्यातील इच्छुक भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण, निवास, भोजन, आरोग्य, शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येणार आहेत. प्रवेशाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी धनगर समाजातील असावा. विद्यार्थ्यांच्या पालकाने विद्यार्थ्यांचे नावे सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या धनगर समाजाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी. विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लक्ष इतकी असावी. सन २०२५-२६ या वर्षात नविन विद्यार्थी १ ली ते ८ वी या इयत्तेत प्रवेशित असावा.

परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता निवड झालेल्या रामराव नाईक इंग्लिश स्कूल, मुन्सीराम तांडा, ता. सोनपेठ जि. परभणी या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी सन २०२५-२६ मध्ये १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे अर्ज २० फेब्रुवारी, २०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, परभणी यांचे नावे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी या कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत. योजनेचा धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

### सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० वाजता शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, परभणी येथे ''पंडित दिनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा'' आयोजीत केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा भव्य महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास विविध नामांकित राज्यातील मोठे उद्योजक /कंपन्या सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डीप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची ट्रेनी ऑपरेटर, क्षेत्र अधिकारी, सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह, फिल्ड ऑफिसर, ट्रेनी केंद्र मॅनेजर, विमा सल्लागार, विमा सखी ऑपरेटर इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी १० ते २५ हजार वेतन असणार आहे. अनुभवानंतर वेतनामध्ये वाढ होवू शकते. शासकीय कार्यालयामध्ये कंत्राटी तत्वावर शिपाई, सफाईकामगार, सुरक्षारक्षक इ. प्रकारच्या नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शासकीय निमशासकीय खाजगी कार्यालयामध्ये प्रशिक्षणासह आर्थिक लाभासह अनुभव प्रमाणपत्र देखील मिळणार आहे.

महारोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या या वेबसाईटवर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नावनोंदणी करणेसाठी दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता आपल्या शैक्षणिक किंवा अनुभव प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांसह जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ संपर्क साधावा असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र.सो. खंदारे यांनी केले आहे.

### शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा १७ फेब्रुवारी रोजी आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी व प्रधानमंत्री इंटर्नशिप मेळाव्याचे आयोजन १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी येथे केले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून आस्थापनामध्ये शिकाऊ उमेदवार भरती केली जाणार आहे. भरती केल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना १४ ते १६ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे.

### विद्यार्थ्यांसाठी अध्यापन हाच केंद्रबिंदू असावा- अजिंक्य नखाते

**पाथरी,/प्रतिनिधी-**



विद्यार्थी दशेत अध्ययन अध्यापन ही प्रक्रिया अत्यंत संवेदनशील आहे, विद्यार्थ्यांनी सातत्याने अध्ययन करावे, चिंतन करावे, मनोरंजनासाठी मैदानी खेळ खेळावा, शालेय जीवनात इलेक्ट्रिक साधनांचा गैरवापर टाळावा, अध्यापन हाच केंद्रबिंदू मानावा असे आवाहन अजिंक्य नखाते यांनी केले.

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी शांताबाई नखाते विद्यालय पाथरी ता.पाथरी येथे पाथरी तालुक्यातील हादगाव बुद्रुक जिल्हा परिषद गटातून ते जि. प. सदस्य पदी निवडून आल्याबद्दल त्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी अजिंक्य नखाते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर शांताबाई नखाते प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एन.ई. यादव,प्राचार्य के. एन. डहाळे, डॉ. राजकुमार कांबळे, निवृत्त मुख्याध्यापक अब्दुल करीम गुणके,डॉ. गुणके मोहम्मद सोहेल मोहम्मद शरीफ आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजकुमार कांबळे यांनी केले.प्राचार्य के एन डहाळे यांनी मनोगत व्यक्त करताना नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य अजिंक्य नखाते यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी राजकुमार कांबळे यांना काशी हिंदी विद्यापीठातून पीएचडी तसेच विद्यालयाचा माजी विद्यार्थी गुणके मोहम्मद सोहेल मोहम्मद शरीफ . यांची पीएचडी साठी निवड झाल्याबद्दल अजिंक्य नखाते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शास्त्री सी.एम. यांनी तर आभार प्रदर्शन बळीराम चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सांस्कृतिक विभागाने परिश्रम घेतले.

# रायगड कॉर्नर जिंतूर नाका महामार्ग 'अतिक्रमणाच्या विळख्यात'; फुटपाथ बंद, पादचाऱ्यांचा जीव धोक्यात!

**सेलू,/प्रतिनिधी-** : रायगड कॉर्नर ते जिंतूर नाका हा दुपदरी महामार्ग असून दोन्ही बाजूंनी मोठ्या नाल्या काढून त्यावर काँक्रीटचे ढापे टाकण्यात आले आहेत. हे ढापे पादचाऱ्यांसाठी फुटपाथ म्हणून वापरण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले होते. मात्र सध्या या ढाप्यांवर बाजूच्या दुकानदारांनी व काही नागरिकांनी अतिक्रमणे करून दुकाने थाटल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरूनच चालावे लागत आहे.

या मार्गावर वाहनांची सततची रेलचेल असल्याने पादचाऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे. आतापर्यंत या रस्त्यावर नऊ जणांनी आपला जीव गमावल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तरीही संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेचा फायदा घेत रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या नालीवरील ढाप्यांवर अतिक्रमणे वाढतच चालली आहेत. त्यामुळे अपघातांची शक्यता अधिक वाढली आहे. संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून सर्व अतिक्रमणे हटवावीत व नालीवरील ढापे (फुटपाथ) पादचाऱ्यांसाठी खुले करून द्यावेत, अशी जोरदार मागणी सेलूकर नागरिकांकडून करण्यात येत आहे.



### वाढदिवसानिमित्त ग्रंथदानाचा प्रेरणादायी उपक्रम

**सेलू,/प्रतिनिधी:-** सेलू येथील सेवानिवृत्त ग्रंथपाल डॉ. शिवाजी रामभाऊ शिंदे यांनी आपल्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील तीन शाळांना प्रत्येकी ६२ ग्रंथांची भेट देत वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला.

न्यू हायस्कूल सेलू, श्री केशवराज बाबासाहेब विद्यालय सेलू आणि जिजामाता प्राथमिक शाळा सेलू या शाळांच्या ग्रंथालयांना ग्रंथ संच सस्नेह प्रदान करण्यात आला. संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

यावेळी ''देणाऱ्याने देत जावे...'' या वि. दा. करंदीकर यांच्या काव्यपंक्तीचा उल्लेख करत डॉ. शिंदे यांनी वाचनाची आवड हीच विद्यार्थ्यांची खरी संपत्ती असल्याचे सांगितले. वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याचा त्यांचा हा प्रयत्न सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.



### नेताजी सुभाषचंद्र विद्यालयात शनिवार साजरा

**मानवत,/प्रतिनिधी :** येथील नेताजी सुभाष शिक्षण संस्थेच्या नेताजी सुभाष प्राथमिक विद्यालया मध्ये आज आनंददायी शनिवार साजरा करण्यात आला.

वेळी विविध उपक्रमा बरोबर मैदानी खेळ घेण्यात आले. यावेळी तक्रार पेटी उघडण्यात आली. तक्रार पेटीत एक ही तक्रार नसल्याने तक्रार निरंक असल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी शालेय मुलांचा शारिरिक विकासा बरोबर बौध्दीक विकास लक्षात घेता विविध उपक्रम घेण्यात आले. यावेळी मा. मुख्याध्यापक अनिल चव्हाण, वर्ग शिक्षिका माने , उपस्थित होते.

### तहसीलदारांचा आदेश उच्च न्यायालयाकडून स्थगित पाथरी तालुक्यातील वाघाळा प्रकरणाला कलाटणी

**पाथरी,/प्रतिनिधी:** तालुक्यातील वाघाळा येथील श्री मारोती मंदिर देवस्थानच्या जमिनीवरील ऊस पिकाचे उत्पन्न एका नोंदणी नसलेल्या समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचे पाथरी तहसीलदरांचे आदेश माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगित केले आहेत. न्यायालयाच्या या निर्णयामुळे याचिकाकर्त्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वाघाळा येथील गट क्र. २३१ मधील ११.९७ हेक्टर जमीन किरण नागोराव घुंबरे आणि इतर शेतकरी २०२१ पासून कसत आहेत. याचिकाकर्त्यांनी दावा केला आहे की त्यांनी सुमारे ३५ लाख रुपयांची गुंतवणूक करून ओसाड जमीन बागायती केली असून, ते नियमितपणे शेतसारा व पाणीपट्टी भरत आहेत. मात्र, गावातील काही व्यक्तींनी राजकीय दबावातून तक्रार केल्याने, तहसीलदारांनी १२ आणि १५ जानेवारी २०२६ रोजी आदेश काढून ऊस गाळपाचे पैसे एका नोंदणी नसलेल्या मंदिर समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचे निर्देश साखर कारखान्याला दिले होते.

**उच्च न्यायालयात आव्हान**

या आदेशांना शेतकऱ्यांनी ॲड. युवराज आर. बारहाते यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत तहसीलदारांना पिकाचे उत्पन्न जप्त करण्याचे किंवा दिवाणी न्यायालयासारखे आदेश देण्याचे अधिकार नाहीत. तसेच, सार्वजनिक न्यासाच्या मालमत्तेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार केवळ धर्मादाय आयुक्तांना असल्याचे युक्तिवाद याचिकेत करण्यात आला. ज्या समितीला पैसे देण्याचे आदेश दिले होते, ती कायदेशीररीत्या नोंदणीकृत नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

**पुढील सुनावणी १६ मार्चला**

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, माननीय उच्च न्यायालयाने तहसीलदार, पाथरी यांच्या १५ जानेवारी २०२६ च्या आदेशाच्या अंमलबजावणीला पुढील तारखेपर्यंत स्थगिती () दिली आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी १६ मार्च २०२६ रोजी होणार आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. युवराज आर. बारहाते आणि ॲड. रंजिता आर. बारहाते - देशमुख काम पाहत आहेत.

### सर सय्यद अहेमद खान उर्दू प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेह संमेलन साजरे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** सर सय्यद अहेमद खान उर्दू प्राथमिक शाळा गुलशन कॉ. जिंतूर या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा राधाकृष्ण मंगल कार्यालय आदर्श कॉलनी जिंतूर येथे पार पडला. या मध्ये शाळेच्या विध्यार्थ्यांनी आपला कलागुणांच्या उत्कृष्ट अदाकारीने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.



तसेच या वार्षिक स्नेहसंमेलना मध्ये शाळेच्या चिमुकल्यांनी सादर केलेल्या नाटीका, गित, , नात, तकरीर एकापेक्षा एक सरस अदाकारीने प्रेक्षकांच्या डोळयांचे पारणे फिटले या कार्यक्रमाला उत्स्फुर्त पणे महिलांच्या व पालकांच्या सहभाग होता. यांनी प्रत्येक सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात बाल कलाकरांचा वेळोवेळी प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आनंद नगरीचे परितोषिक देण्यात आले. तसेच शाळेतर्फे घेण्यात आलेल्या दिनियात व मासिक टेस्ट परीक्षा चे पारितोषिकही मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. आणि शाळारत्न म्हणुन जोया परवीण शेख साजिद यांना शेख सोहेल अहेमद (मा.नगर सेवक जिंतूर) यांच्या कडुन ट्राफी व सर्टिफिकेट देण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. एस. के अहेमद (जेष्ठ पत्रकार जिंतूर) कार्यक्रमाचे उदघाटक, मा.श्री.प्रतापराव विनायकराव देशमुख ( अध्यक्ष नगर परिषद जिंतूर) यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. त्र्यंबक पोले साहेब(गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जिंतूर),मा.श्री. मोहसीन खान (उपनगराध्यक्ष जिंतूर)),मा.श्री.सचिन उर्फ मुन्ना गोरे, ( नगरसेवक जिंतूर),मा. श्री.मो अथर मो. नूर (नगरसेवक जिंतूर),मा.श्री.एम. डी. घुगे (केंद्र प्रमुख जिंतूर),मा.श्री. शेख शकील अहमद (पत्रकार जिंतूर)मा.श्री. रियाज चाऊस ( न्यूज जिंतूर),मा.श्री.शेख अलीम ( न्यूज जिंतूर), रामप्रसाद कंठाळे (पत्रकार जिंतूर),शेख सोहेल अहेमद (मा.नगरसेवक जिंतूर), हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे पर्यवेक्षक म्हणून मा.श्री. मौलाना सिराजुद्दीन नदवी आणि मा.श्री. असद अमजद हूसैन सर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



परभणी महापौर पदी सय्यद इकबाल यांची निवड झाल्याबद्दल लक्ष्मी नगरी पाथरी रोड परभणी येथील नागरिकाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

## इटोली माध्यमिक आश्रमशाळेचा विद्यार्थी अनिकेत घुगेची भरारी, बाल संशोधक विमानाने करणार प्रवास

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिद्द, चिकाटी आणि विज्ञानाची ओढ असेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थी यशाची मोठी शिखरे सर करू शकतात हे जिंतूर तालुक्यातील संत भगवानबाबा माध्यमिक आश्रमशाळा इटोली येथील विद्यार्थी अनिकेत दीपक घुगे यांने सिद्ध केले आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विज्ञान प्रेरणा अभियाना अंतर्गत विजाभज आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रो ( ) बेंगळुरू येथे अभ्यास दौऱ्यासाठी निवड परीक्षा घेण्यात आली होती.

सदरील परीक्षेमध्ये या आश्रमशाळेचा विद्यार्थी अनिकेत दीपक घुगे हा यशस्वी झाल्यामुळे त्याची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. हा दौरा १५ फेब्रुवारी २६ ते २० फेब्रुवारी २६ पर्यंत असणार आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून आश्रमातशाळेतील शिकत असणाऱ्या मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनासाठी रुजविण्यासाठी हा विशेष अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यातील निवडक गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अनिकेतने आपले स्थान पटकावले आहे. या दौऱ्यात विद्यार्थ्यांना थेट विमानाने बेंगलोर येथील इस्त्रो केंद्राला भेट देता येणार आहे.



चिमुकल्या संशोधकाचा असा असणार अभ्यास दौरा विद्यार्थी १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत पुणे बेंगळुरू,त्रिवेंद्रम,कन्याकुमारी या शहरातील विविध ठिकाणांना भेटी देणार आहेत. १५ फेब्रुवारी रोजी पुणे - पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व नॅशनल वार मेमोरियल येथे भेट. १६ फ ेब्रुवारी पुणे- भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था येथे प्रयोगाधारित विज्ञान कार्यशाळा व शास्त्रज्ञाशी संवाद. १६ फेब्रुवारी रोजी पुणे-विमानतळावर मा.ना अतुलजी सावे व विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज विद्यार्थ्यांशी संवाद साधणारा असून इस्त्रो दौऱ्यासाठी हिरवी झेंडी दाखवणार आहेत. १७ फेब्रुवारी बेंगळुरू- विश्वेश्वरय्या औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय, हिंदुस्तान विमान निर्मिती वारसा संग्रहालय व लालबाग वनस्पती उद्यान भेट.१८ फ ेब्रुवारी तिरुवनंतपुरम (तुम्बा)- भारतीय अंतराळ संशोधन संस्था केंद्र, उपग्रह प्रदर्शन विभाग व प्रक्षेपण तंत्रज्ञान गॅलरी भेट, रॉकेट प्रक्षेपणाचे अवलोकन तसेच नेपियर संग्रहालय व कोवलम समुद्रकिनारा भेट. १९ फेब्रुवारी कन्याकुमारी- पद्मनाभपुरम राजवाडा, विवेकानंद शिला स्मारक, तिरुवल्लवर पुतळा,गांधी स्मारक तसेच सूर्यास्त दर्शन. २० फ ेब्रुवारी २०२६ रोजी विमानाने पुण्याकडे प्रयान. अशा पद्धतीने या बाल संशोधकाची सहा दिवशीय अभ्यास दौरा संपन्न होणार आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी अनिकेत दीपक घुगे याची निवड झाल्याबद्दल जिंतूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये तसेच इटोली परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आश्रमशाळेच्या वतीने अनिकेत तसेच त्याचे पालक यांचा या यशाबद्दल यथोचित सन्मान करण्यात आला व त्याच्या इस्त्रो वारीसाठी मा.श्री रामेश्वरजी मुंडे सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण परभणी, संस्थाध्यक्ष श्री प्रतापराव घुगे, सचिव श्री केशव घुगे, संचालक श्री विठ्ठल घुगे, आश्रमशाळेचे प्राचार्य श्री रमेश दराडे तसेच सर्व शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी शुभेच्छा दिल्या.

## अग्रलेख...

# संसदीय आणि असंसदीय

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील अधिवेशनाची शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) सांगता झाली. दुसऱ्या टप्प्यातील अधिवेशन ९ मार्चपासून सुरू होणार आहे. संसदेची दरवर्षी तीन अधिवेशने होत असतात. त्यातील पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने सलग होतात, फक्त अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यांत होत असते. अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होते. पावसाळी आणि हिवाळी अधिवेशनात राष्ट्रपतींचे असे अभिभाषण होत नाही. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत चर्चा होत असते आणि तिला पंतप्रधान उत्तर देत असतात. यावेळी ज्येष्ठांचे सभागृह असलेल्या राज्यसभेत धन्यवाद प्रस्तावावर सुरळीत चर्चा झाली आणि तिला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तरही दिले. कनिष्ठ सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकसभेत मात्र धन्यवाद प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे त्या सभागृहात पंतप्रधानांचे चर्चेच्या उत्तराचे भाषणही होऊ शकले नाही. चर्चा आणि पंतप्रधानांच्या उत्तराशिवायच धन्यवाद प्रस्ताव लोकसभेत पारित करावा लागला. त्यामुळे एक संसदीय परंपरा खंडित झाली. ज्येष्ठांचे सभागृह असलेली राज्यसभा जो संयम आणि सभ्यपणा दाखवू शकली, तसा संयम आणि सभ्यपणा लोकसभेला दाखवता आला नाही, याची सर्वांना खंत वाटत असणार. त्यामागील घटनाक्रम लक्षात घेतला तर काही खटकणाऱ्या बाबी लक्षात येतात.

लोकसभेत या काळात जो घटनाक्रम उद्‌भवला, तो संसदीय लोकशाहीला काळिमा फासणारा होता. लोकसभेतील विरोधी पक्षांच्या विशेषतः काँग्रेसच्या सदस्यांनी जो गोंधळ घातला, तो कुणालाही न पटणारा होता. संसदेच्या दोन्ही सभागृहांत अतिशय संयमाने आणि काळजीपूर्वक शब्द वापरावे लागतात. एखादा शब्द असंसदीय असेल तर तो वापरता येत नाही आणि कुणी अनवधानाने वा जाणीवपूर्वक वापरला तर तो कामकाजातून वगळला जातो. या प्रथेची जराही तमा काँग्रेसने बाळगली नाही. काँग्रेसच्या सदस्यांचे सर्वांत धक्कादायक कृत्य म्हणजे ते पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धावत गेले. सभागृहात काहीतरी अप्रिय घडवण्याचा त्यांचा प्रयत्न होता, याची कुणकुण लागल्यामुळे आपणच पंतप्रधानांना सभागृहात येण्यापासून रोखले, असा जो गौप्यस्फोट लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी केला, तो ऐकून तर देशवासीयांना जबरदस्त धक्का बसला. बिर्ला यांनी अप्रिय प्रसंग टळला, असे म्हटले असले तरी तो अप्रिय प्रसंग कोणता असू शकतो, याचा अंदाज देशवासीयांना नक्कीच आला आहे. त्यादिवशी लोकसभेत जे घडले, ते पाहून आपण लोकसभेत बसलो आहे, यावर विश्वास बसत नव्हता. जगातील अनेक देशांच्या संसदेत हाणामारी झाल्याचे दृश्य वृत्तवाहिन्यांवर आपण अनेकदा पाहिले आहे. तसाच प्रसंग आपल्याही लोकसभेत घडण्याची स्थिती उद्‌भवली होती, हे पाहून संसदीय लोकशाहीवर प्रेम करणाऱ्यांची मान शरमेने खाली झुकली. ज्या महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात आली, त्यातील काही महिला भर सभागृहात असे वागत असतील आणि पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धावून जात बॅनर फडकवत घोषणाबाजी करत असतील, तर या देशातील संसदीय लोकशाहीचे भवितव्य त्यांच्याच हातून पणाला लावले जात आहे, असे म्हटले जाऊ शकते. सभागृहात विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांनी पंतप्रधानांवर हल्ला केला असता तर भारतातील लोकप्रतिनिधींना जगात तोंड दाखवायला जागा राहिली नसती. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबद्दल बोलायला तर शब्दच नाहीत. विरोधी पक्षनेता कसा नसावा, हे राहुल गांधी आपल्या बेजबाबदार वागणुकीने वारंवार दाखवून देत आहेत. देशात आजपर्यंत अनेक विरोधी पक्षनेते झालेत, यातील प्रत्येकाने आपल्या कृतीने आणि भाषणाने त्या पदाची मान उंचावली. पण राहुल गांधी यांच्या कृतीने या पदाचा गौरव कमी झाला. त्यामुळे भाजपाचे निशिकांत दुबे यांनी राहुल गांधी यांच्यासाठी जो विशेष प्रस्ताव आणला, तो योग्यच म्हटला पाहिजे. दुबे यांनी राहुल गांधी यांचे सदस्यत्व रद्द करण्याची तसेच त्यांच्यावर आजीवन निवडणूक लढवण्यावर बंदी घालण्याची मागणी केली आहे, जी योग्य म्हटली पाहिजे. संसदेतील गोंधळाबद्दल विरोधी पक्षांच्या ८ सदस्यांना निलंबित करीत सभापती ओम बिर्ला यांनी सौम्यपणा दाखविला आणि चूक केली, असे म्हणावेसे वाटते. त्यांनी विरोधी पक्षांच्या सर्व सदस्यांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंतच नव्हे तर लोकसभेच्या उर्वरित कालावधीपर्यंत निलंबित करायला हवे होते. ओम बिर्ला यांनी तसे केले नाही, हा त्यांच्या मनाचा मोठेपणाच. त्यानंतर विरोधकांनीच त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करत आपल्या निर्ढावलेल्या मानसिकतेचे प्रदर्शन केले. सभागृहात सत्तारूढ रालोआचे बहुमत असल्यामुळे हा अविश्वास प्रस्ताव पारित होऊ शकणार नाही, ही गोष्ट वेगळी. पण सभागृहातील चांगुलपणाच्या वागणुकीची शिक्षा विरोधकांनी ओम बिर्ला यांना दिली, हे आक्षेपार्ह म्हटले पाहिजे.

सभागृहातील नवीन विशेषतः विरोधी पक्षांतील जास्तीत जास्त सदस्यांना बोलण्याची संधी ओम बिर्ला देत असतात. पण विरोधी पक्षाच्या या सदस्यांनी कृतघ्नपणाचे प्रदर्शन करत त्यांना पदावरून हटवण्याचे कारस्थान रचले असावे, असे दिसते. सामान्यपणे सभागृहात गोंधळ घालणारे सदस्य सभापतींनी सभागृहाचे कामकाज स्थगित केल्यावर शांत होतात, सभागृहातील तणावाच्या परिस्थितीवर सर्व गटनेते सभापतींच्या दालनात बसून चर्चा करतात आणि तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात. पण यावेळी नवा धक्कादायक प्रकार समोर आला. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यावर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभापतींच्या दालनात धाव घेत तेथे बिर्ला यांच्याविरुद्धही घोषणाबाजी केली, त्यांना शिवीगाळ केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या घटनेचा व्हिडीओ जारी करीत विरोधी पक्ष सदस्यांच्या अनियंत्रित वर्तणुकीचा पर्दाफाश केला, असे म्हणायला पाहिजे. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात आक्रमक राहिले पाहिजे, सरकारला धारेवर धरले पाहिजे, हे अपेक्षितच आहे. पण आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यातील फरक विरोधी पक्षांनी लक्षात घेतला पाहिजे. विरोधी सदस्यांचे सभागृहात जे वर्तन आहे, ते आक्रस्ताळेपणाचे आहे. देशातील जनता आपल्याला सातत्याने नाकारत आहे, या निराशेतून आलेले आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ही संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत. ही चाके व्यवस्थित चालत असतील तर संसदीय लोकशाहीचा रथ व्यवस्थित चालू शकेल. अन्यथा हा रथ कोलमडून पडेल. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवणे ही सभापतींसोबत सत्तारूढ पक्षाचीही जबाबदारी आहे, असे विरोधी पक्षात असताना भाजपाचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली नेहमी म्हणत असत. त्यामुळे सत्तारूढ भाजपानेही यादृष्टीने कोणताही पूर्वग्रह न ठेवता चांगली परंपरा निर्माण केली पाहिजे, जेणेकरून विरोधकांना बोट दाखविण्यास जागा उरणार नाही. विरोधी पक्षांना समजून घेण्यात आणि समजावून सांगण्यात आपण कमी पडतो आहे काय, याचा सत्ताधीशांनी विचार केला पाहिजे. लोकसभेचे सभागृह हे चर्चेचे व्यासपीठ आहे. या ठिकाणी जनतेच्या भल्याच्या मुद्यांवर चर्चा होणे अपेक्षित आहे, गुद्यांवर नव्हे. परंतु, विरोधकांनी प्रत्येक वेळी गोष्टी हमरी-तुमरीवर नेल्या. विरोधकांचे वर्तन चांगल्या वातावरणात चर्चा होण्याकरिता पोषक नव्हते. सत्ताधाऱ्यांएवढीच जबाबदारी विरोधकांचीही आहे. त्यांनाही लोकांनी निवडून दिले आहे. लोक सत्ताधाऱ्यांचे वर्तन पाहतात, तसे विरोधकांचेही पाहतात. सत्ताधीशांना जोखत असतात, तसे विरोधकांचेही पाणी आजमावत असतात. शेवटी लोकसभा हे सार्वभौम सभागृह असेल तर त्यातील प्रतिनिधींना निवडून देणारे भारतीय नागरिकही सार्वभौम आहेत. लोकसभेत त्यांच्या हिताच्या मुद्यांवर चर्चा व्हावी आणि त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूंनी सकारात्मक सहकार्याची भूमिका घेतली जावी, संसदीय वर्तन केले जावे अशी लोकांना अपेक्षा आहे. संसदीय लोकशाहीला अपेक्षित असलेली परिपक्वता दोन्हीकडून दाखविली जाणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींच्या सभागृहात गोंधळ ही नवी बाब नसली तरी तो सतत होणे हे लोकांनाही आवडलेले नाही, याची नोंद साऱ्यांनी घेतलेली बरी. ▮

## विशेष

अभय बाळकृष्ण पटवर्धन

# ११४ राफेल विमान खरेदीचा अन्वयार्थ

अ‍ॅस्ट्रा क्षेपणास्त्र प्रणालीतील १६० किलोमीटरपेक्षा जास्त हवेतून हवेत मारा करणाऱ्या अ‍ॅस्ट्रा एमके२ क्षेपणास्त्र आणि अ‍ॅस्ट्रा एमके३,३५० किलोमीटर पल्ला, सॉलिड फ्युएल डक्टेड रॅमजेट (एसएफडीआर) क्षेपणास्त्र; २) रुद्रएम स्ट्राईक प्रणालीमधील रुद्रएम-२, एक हायपरसोनिक एरो बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि ५५० किलोमीटरच्या पल्ल्यातील लक्ष्यांवर मारा करण्यास सक्षम रुद्रएम-३ क्षेपणास्त्र व रुद्रएम-४ चे भविष्यातील एकत्रीकरण. एक शक्तिशाली, स्वदेशी रेडिएशन-विरोधी ढाल बनेल. ३) अचूक स्ट्राईक क्षमता या एकत्रीकरण यादीमध्ये तारा प्रिसिजन गाईडेड म्युनिशन; एक हाय स्पीड, रेंज एक्सटेंशन किट सुसज्ज, लो ड्रॅग ग्लाईड स्टँड ऑफ अंतरावर अचूक प्रहार करणारा बॉम्ब ही शस्त्र सामील आहेत.

वाढीव संपर्कामुळे (कनेक्टिव्हिटी) हे विमान मोठ्या लढाऊ नेटवर्कमध्ये डेटा नोडचे काम करेल. ही एक गेम चेंजर आणि संभाव्य संरक्षण गरजांसाठी दीर्घकालीन रणनीतिक गुंतवणूक असेल. राफेल एफ ५ भविष्यातील हवाई लढाऊ वातावरणासाठी डिझाईन केली आहे. त्यांची प्रगत यंत्रणा मानव/मानवरहित निष्ठावंत विंगमन लढाऊ ड्रोन नियंत्रित करेल. यात डेटा फ्यूजन आणि डीप स्ट्राईक क्षमता आहेत. सूत्रांनुसार नवीन जेट्स आवश्यकतेनुसार स्वदेशी शस्त्र एकत्रित करण्यास सक्षम असतील आणि परदेशी मूळच्या इतर विमानांशी अखंड संवाद राखतील. असे असले तरी या कारणास्तव आगामी करारात सोर्स कोड हस्तांतरण अनिवार्य (नॉन निगोशिएबल ट्रान्सफर) असेल.

या करारात मेक इन इंडिया फ्रेमवर्क अंतर्गत भारतीय कंपन्यांना उत्पादन, देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल सुविधा, संयुक्त उपक्रम आणि पायाभूत सुविधा विकास यांच्या भागीदारीचा समावेश असणे अनिवार्य असेल. भारतीय वायुसेनेसाठी एकत्रित दृष्टिकोन राष्ट्रीय सुरक्षा धोरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. २०६० च्या दशकात ११४ राफेल्स भारतीय वायुसेनेचा कणा असतील. त्यामुळे त्यांच्याभोवती एक सार्वभौम शस्त्रास्त्र परिसंस्था स्थापित करणे आवश्यक आहे. कोणतही लढाऊ विमान, स्वदेशी प्रणालींशी सुसंगत असले तरपरदेशी मूळ उपकरण उत्पादकांवर अवलंबून राहत नाही. ही लवचीकता, बाह्य भू राजकीय घटक/पुरवठा साखळीच्या संभाव्य व्यत्ययांचा धोका टाळेल.

२०० राफेल विमानांच्या खरेदीमुळे चिनी वायुसेना, एरोस्पेस आणि क्षेपणास्त्र परिसंस्था तसेच पाकिस्तानची वृद्धिंगत होत असलेली सामरिक एकात्मता यामुळे निर्माण झालेल्या दोन आघाड्यांवरील वाढत्या लष्करी दबावांना एक कॅलिब्रेटेड धोरणात्मक प्रतिसाद मिळेल. सतत उच्च टेम्पो ऑपरेशन्स सक्षम करता येतील आणि भारतीय लष्कर/वायुसेनेच्या गणितात मूलभूत बदल होईल. ही नेटवर्क केंद्रित इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या



लवचीक आणि बहुभूमिका लढाऊ विमान संघर्षाच्या सुरुवातीला हवाई युद्ध क्षेत्राला सक्षम आकार देईल आणि ५० स्क्वॉड्रन फोर्स आर्किटेक्चरमुळे संरचनात्मक परिवर्तन निर्माण होईल. आजमितीला भारतीय वायुसेनेत २९ लढाऊ स्क्वॉड्रन आहेत जे अधिकृत ४२ च्या संख्येपेक्षा खूपच कमी आहे. २०३० च्या दशकाच्या अखेरीस मिग-२१, मिग-२७, जग्वार, मिग-२९ आणि मिराज २००० विमानांच्या निवृत्तीमुळे ही तफावत वाढतच गेली असती.

आज चीनकडे २३०० हून अधिक लढाऊ विमान असून पाकिस्तानकडे जेएफ प्रणालींची २४-२५ स्क्वॉड्रन आहेत. २०३५ च्या सुमारास १२६ भारतीय तेजस एमके २ विमान वायुसेनेत दाखल होतील. २०४० पर्यंत आयएएफ अंदाजे २०० राफेल, १८० तेजस एमके१ए, १२० तेजस एमके२, २०० अपग्रेडेड एसयू ३० एमकेआय आणि प्रारंभिक एएमसीए स्क्वॉड्रन यांचा समावेश असलेला फोर्स मिक्स असेल. या संदर्भात २०० हून अधिक राफेल विमानांमुळे भारताच्या हवाई शक्तीतील धोरणात्मक सक्षम परिवर्तन होऊन ती आगामी काळात भारताच्या हवाई लढाऊ भूमिकेला आकार देईल. वर उल्लेखित सर्व माहिती विविध सूत्र/स्वानुमानांनुसार उद्‌धृत केली आहे. कदाचित हे आकडे अतिशयोक्त आणि इच्छाशक्ती दर्शवणारेही वाटू शकतात. पण अंतिम करारावर स्वाक्षरी होईपर्यंत कुठल्याही प्रकारची अचूक आकडेवारी मिळू शकणार नाही.

या भेटीदरम्यानच हा करार पूर्वीच्या सरकार-ते-सरकार (जीटूजी) मॉडेलच अनुसरण करेल का हे स्पष्ट होईल. अशा मोठ्या करारांचे विविध पैलू, घटक आणि अडचणी सोडविण्यासाठी किमान १२-१८ महिने लागतात. त्यामुळे १८-२० फेब्रुवारी २६ दरम्यान हस्ताक्षर झालेल्या या करारानंतर १८ उड्डाणासाठी तयार राफेल विमानांची पोचवणी (फ्लायअवे एयरक्राफ्ट डिलिव्हरी) २०२८-२९ मध्ये होईल, देशांतर्गत असेंब्ली २०३०-३१ मध्ये सुरू होईल आणि वायुसेनेत भारतातील युनिट्ससह सर्व ११४ विमान यायला किमान २०३५-३६ उजाडण्याची शक्यता आहे. अर्थात ही टाईम फ्रेम; तंत्रज्ञान हस्तांतरण, स्थानिक उत्पादन स्केल क्षमता, संभाव्य एसपी/ऑफसेट्स आणि विमानामधील पार्ट्सची स्थानिक उत्पादन क्षमता किती जलद व कार्यक्षम आहे/असेल यावर अवलंबून असेल. ३६ अब्ज डॉलर्सची राफेल खरेदी मोठी वाटत असली, तरी संरक्षण खरेदीची पूर्ण रक्कम आगाऊ दिली जात नाही. आर्थिक वर्ष आणि त्या पुढे, वायुसेनेच वार्षिक आवंटन ९/१० अब्ज डॉलर्स होईल जे हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्र, रडार आणि या विमान खरेदीसाठी पर्याप्त असेल. हा करार १० वर्षांचा असेल तर वार्षिक देयक सरासरी ३.६ अब्ज होतील. हा खर्च वायुसेना आवंटनाच्या ३५-४० टक्के असेल आणि इतर गरजांसाठी अंदाजे ५.५-६ अब्ज डॉलर्स उरतील. १५ वर्ष करारात हीच रक्कम २.४ अब्ज आणि ६.५-७.५ अब्ज डॉलर्स असेल. पश्चिमेकडे पाकिस्तान सीमा, उत्तरेकडे चीन सीमा आणि पूर्वेकडे बांगलादेशच्या सीमेवर एकाच वेळी ऑपरेशनसाठी तयारीला भारत प्राधान्य देतो या आव्हानाला तोंड देण्यासाठी, भारतीय वायुसेना आपली अधिकृत संख्या ५० स्क्वॉड्रनपर्यंत वाढविणार आहे. प्रत्येक स्क्वॉड्रनमध्ये साधारणपणे १८ विमाने असतात. त्यामुळे या नवीन संरचनेसाठी प्रशिक्षण आणि राखीव युनिट्स वगळता सुमारे ९०० लढाऊ विमानांची आवश्यकता असणार आहे.

आयात केलेल्या विमानांवरच भारताचे अवलंबित्व; संपूर्ण गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक निर्णय आत्मनिर्भरतेला पूरक ठरेल तरच राफेलची ही आयात परिपूर्ण ठरेल. यामुळे देशांतर्गत आराखडा, उत्पादन आणि इंजिन तंत्रज्ञानावर आधारित एक सार्वभौम लढाऊ विमान परिसंस्था निर्माण होऊन ती भारतासाठी खरी आयात अध्याय असेल/बनेल. २०४०-६० मधील युद्ध हवाई प्लॅटफॉर्मची योजना; मानव/मानवरहित संघटन, एआय चाळीत मिशन व्यवस्थापन, सेन्सर संतृप्ती युद्ध, निर्देशित ऊर्जा शास्त्र, लांब पल्ल्याचा स्टॅन्ड ऑफ वर्चस्व आणि गुप्त/चोर हल्ला या संकल्पनांवर आधारित असल्यामुळे भारतीय वायुसेनेसाठी पाचव्या/सहाव्या जनरेशन विमानांची बांधणी व उत्पादन त्या दिशेने होणे आवश्यक आहे. विमानांची आयात भारताला शस्त्र, सॉफ्टवेअर, स्पेयर पार्टस आणि जीवनचक्र कराराच्या चक्रव्यूहात अडकवत असल्यामुळे भांडवलाचा निचरा होऊन औद्योगिक सार्वभौमत्व कमकुवत होईल आणि आत्मनिर्भयतेला सुरुंग लागेल. राफेल जागतिक दर्जाचे फिफ्थ जनरेशनचे विमान असले तरी ते वायुसेनेच्या विकासाचा पूल (ब्रिज) आहे. गंतव्य स्थान (एंड स्टॉप) नाही. **(समाप्त)** ▮

(लेखक निवृत्त कर्नल आहेत.)
९४२२१४९८७६

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# रडून मदत घेणारे धन्यवाद विसरले!

जगातील सर्वांत स्वस्त वस्तू म्हणजे सल्ला आहे. एकाकडे मागा हजार जण देतील. मात्र जगातील सर्वांत महाग गोष्ट म्हणजे मदत होय. हजार जणांना मदत मागा, त्यापैकी एखादाच करेल. ही वस्तुस्थिती असतानाही वेळ आल्यावर रडून मदत घेणारे आज धन्यवाद देणे विसरले आहेत. तसा विचार करता सापाच्या दातात, विंचवाच्या नांगीत आणि दुर्जन व्यक्तीच्या मनात किती विष भरलेलं आहे, हे कोणालाच माहीत नसतं. म्हणूनच या तिघांपासून सावध राहा असा सल्ला अनुभवी आपल्याला वारंवार देत असतात. तरीही समाजभान जपणारे लोक सढळ हाताने पीडितांना, गरजवंतांना मदतीचा हात देत धन्यता मानतात. मात्र जी मंडळी रडून मदत मिळविते, ती नंतर त्यांच्याप्रति कृतज्ञताही व्यक्त करीत नाही. याचे कारण काय याचाही शोध घेण्याची गरज आता निर्माण झाली आहे. तसे पाहता पूर्वीचे लोक सांगून गेले की, 'ज्याचे करावे भले, तो म्हणतो माझेच खरे' याचाही प्रत्यय लोकांना वारंवार येत आहे. आपल्या संस्कृतीचा विचार केला असता, सर्वांनाच कृतज्ञता व्यक्त करण्याची गोष्ट पुन्हा एकदा शिकवावी लागणार आहे. वस्तुतः शाळेत लघुकोन, काटकोन, त्रिकोण, चौकोन शिकविले जातात. पण आपले कोण हे मात्र परिस्थिती शिकवते. याच परिस्थितीचे भान ठेवत शाळांनी, पालकांनी आणि समाजानेही पुढाकार घेत सर्वांनाच मदत करणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला शिकवायला हवे. धन्यवाद दिल्याने माणूस लहान होत नाही. उलट मदत करणारा सुखावून पुन्हा तिसऱ्याला सहकार्य करण्यासाठी तत्पर राहतो. यालाच तर चांगले कार्य म्हटले जाते ना?

तसे पाहता वर्तमानात कृतज्ञता आणि कृतघ्नपणा यातील भेदही मुला-मुलींना सांगायला हवा. आज मानवी मन स्वार्थी झाले आहे. 'गरज सरो अन् वैद्य मरो' ही संस्कृती आता वाढली आहे. ही संस्कृती मानवतेसाठी घातक ठरू शकते. आता नाही का एका मुलाने आपल्या नातेवाईकाचा मृतदेह स्वतःच झोळी बांधून गावात नेला. त्याला शववाहिकाही मिळाली नाही. हे कशाचे द्योतक आहे, याचाही विचार करायला हवा. १४० कोटी लोकसंख्येच्या देशात कोट्यवधी गाड्या असताना एकही वाहन त्याला मिळत नाही, ही बाब नक्कीच विचार करायला लावणारी आहे. सरसकट सर्वच लोक एवढे निष्ठुर का झाले असावेत, ही बाब नक्कीच चिंतनीय ठरली आहे. चांगले काम केल्यावर ते विसरून जा अशीच शिकवण आपल्याला मिळाली. फक्त कर्म करीत राहा, फळाची अपेक्षा करू नको असेही सांगितले गेले. कृती कुठलीही असो, ती झाल्यावर काही ना काही परिणाम होणारच आहे, हेच विज्ञानाने सांगितले. 'प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते' हा नियम पाहता तुम्ही केलेल्या चांगल्या किंवा वाईट कृतींचे परिणाम आपल्याला भोगावे लागतात. ही बाब विज्ञानाने पटवून दिली आहे. मग विज्ञान विसरून कसे चालणार? तसे पाहता समाजात कर्णाची फौज निर्माण करायची झाल्यास चांगले काम करणाऱ्यांची प्रशंसा व्हायला हवी. येथे तर मदत करणारा कर्ण कुठे अडतो अन् केव्हा त्याला संपवितो असाच कृतघ्न समाज आपण निर्माण करीत आहोत. मग तुम्हाला मदत करणारा नेमका कसा उपलब्ध होईल? अपघातग्रस्तांना मदत करा, तुम्हाला शासनाकडून २५ हजार रुपये पारितोषिक मिळेल, अशी घोषणा सरकारला करावी लागते, ही बाब भूषणावह नसून, लाजिरवाणी आहे. जी व्यक्ती जन्माला आली, तिच्याकडून मदतीचा भाव अभिप्रेत आहे. पण केवळ मदत घेणारे वाढले. मात्र मदत करायची झाल्यास मला काय त्याचे असे म्हणत पळ काढणाऱ्यांचीच फौज समाजाने तयार केली आहे. याच कारणाने आज समाजात दुर्योधन वाढले अन् कर्ण नामशेष झाले आहेत. पूर्वी आपल्याकडे अनेक दानशूर मदत करायचे. पण त्यांचे कौतुक करायचे सोडून केवळ समाजाने त्यांना बदनाम करण्यावरच भर दिला. परिणामी 'नेकी कर जूते खा' हा प्रकार समाजभान जपणाऱ्यांसाठी कर्दनकाळ ठरला. फार पूर्वी एखाद्या सद्‌गृहस्थाने मदत केली तर त्याच्याविषयी संबंधित व्यक्ती चारचौघात कृतज्ञता व्यक्त करून धन्यवाद द्यायचा. परिणामी तो मदत करणारा सद्‌गृहस्थ मनातल्या मनात सुखावून जायचा आणि पुन्हा अनेकांना मदतीसाठी सदैव हात जोडून तत्पर राहायचा. आता मात्र संकटात असलेला प्रथमतः मगरीप्रमाणे अश्रू ढाळतो अन् मदत मिळवतो. पण त्यानंतर तो मदत करणाऱ्यांना धन्यवादही द्यायला विसरतो. आपण मुलांकडून असाच कृतघ्नपणा अपेक्षित ठेवला आहे का? याचे उत्तर नाहीच असे राहील. मग आजपासून मदत करणाऱ्यांबद्दल जाहीर कृतज्ञता व्यक्त करण्याची मोहीमच हाती घ्यावी लागेल. तेव्हाच मदत करणारे सुखावतील अन् समाजात दुर्योधन कमी होऊन कर्ण वाढतील. ▮

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र


नागेश दाचेवार

# उद्धवराव, असे वागू नका!

महाराष्ट्राच्या राजकारणात हिंदुत्वाचा झेंडा खांद्यावर घेऊन उभं राहिलेलं एक मोठं नाव म्हणजे बाळासाहेब ठाकरे होय. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुहृदयसम्राट म्हणून मिळवलेली ओळख ही केवळ उपाधी नव्हती, ती एक विचारसरणी होती. पण आज प्रश्न उपस्थित होतोय, त्या विचारांचा वारसा नेमका कुठे हरवला? परभणीत मुस्लिम महापौर बसविल्यानं उद्धव ठाकरेंच्या ढोंगी हिंदुत्वाचा बुरखा फाटला. उद्धव ठाकरेंचा निर्लज्ज राजकीय व्यवहार या घटनेने उघडा पडला आहे.

२०१९ मध्ये सत्तेसाठी झालेला राजकीय बदल, हा फक्त आघाडी बदल नव्हता, तर वैचारिक धर्मांतरणाचा एक प्रकार होता. भाजपाशी दशकानुदशके चाललेली युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय, ही केवळ सत्ता आणि खुर्चीसाठी तडजोड नव्हती, तर विचारांची तिलांजली होती. हे नंतरच्या काळात वारंवार अधोरेखित झाले.

भाजपाचा विश्वासघात करून हिंदुत्व सोडलेल्या उद्धव ठाकरेंनी २०१९ सालापासूनच दाढ्या कुरवाळण्याचं काम सुरू केलं आहे. यांनी अजान स्पर्धा भरविली, हिंदुहृदयसम्राटांना जनाब संबोधायला लागले, हिंदुहृदयसम्राट शब्द वापरातून बाद करत, वंदनीय म्हणायला लागले, दिनदर्शिका उर्दूत छापल्या आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत हिरवे झेंडे फडकवले, मुंबई ब्लास्टमधला आरोपी यांच्या उमेदवारांच्या प्रचार रॅलीमध्ये घोषणा देताना दिसला होता. सातत्यानं हिंदुत्वविरोधी भूमिका घेतल्यानं मुंबईतल्या जनतेने विधानसभा किंवा आता महापालिकेत देखील यांना हद्दपार केलं आहे. राज्याचा विचार केला तर, महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत, नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये या राज्यातील जनतेने केलेले यांच्या पक्षाचे दयनीय हाल बघता बघवेना झाले आहेत.



हिंदुत्वाचा राजकीय आधार घेऊन वाढलेल्या पक्षाने आता समावेशक राजकारणाच्या नावाखाली आपली जुनी भूमिका सोडली का? याचं उत्तर आता परभणीने दिले आहे. राजकारणात शब्दांना किंमत असते. भाषणात एक भूमिका आणि कृतीत दुसरी, हीच गोष्ट जनतेला खटकते. शेवटी जनतेला एकच गोष्ट महत्त्वाची वाटते विश्वासार्हता. शब्द आणि कृती यामध्ये दरी निर्माण झाली की राजकीय विश्वास कमी होतो. हिंदुत्वाच्या नावावर उभं राहून वेगळ्या दिशेने जाणं किंवा वेगळ्या विचारसरणीचा उदोउदो करूनही हिंदुत्वाचा दावा करणं, अशी दुटप्पी भूमिका आता चालणार नाही. असा इशारा महाराष्ट्रातील जनतेने जनाबांना दिला आहे.

अजान स्पर्धा, उर्दू दिनदर्शिका, विशिष्ट मतदारवर्गाला साधण्याचे प्रयत्न हे सर्व तुमच्या बदलत्या राजकीय समीकरणाचा भाग असतील, पण यामुळे मूळ समर्थक दुखावला आहे. हिंदुत्वावर उभा राहिलेला पक्ष अचानक वेगळ्या भाषेत बोलू लागला, तर कार्यकर्तेच नव्हे, मतदारदेखील दुखावतात, संभ्रमात पडतात आणि मग वेगळे मार्ग शोधतात. काळ बदलतो, राजकारण बदलतं. पण विचार बदलतात का? हिंदुत्व किंवा मग मराठी अस्मिता हा फक्त निवडणुकीपुरता मुद्दा होता का?, आज उद्धव ठाकरे यांच्यासमोर सर्वांत मोठं आव्हान म्हणजे स्वतःची स्पष्ट ओळख प्रस्थापित करणं. ते ठाम हिंदुत्ववादी आहेत का? की त्यांनी धर्मनिरपेक्ष राजकारणाची वाट स्वीकारली आहे? दोन्ही एकाच वेळी शक्य नाही. कारण राजकारणात द्वंद्व फार काळ चालत नाही. परभणीचा निर्णय हा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरता विषय नाही. राजकीय वास्तव हे आहे की, महाराष्ट्रात सध्या बहुकोनी लढाई सुरू आहे. भाजप, शिवसेना, ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार गट या सगळ्यात उद्धव ठाकरेंच्या वाट्याला आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी आता संघर्ष करावा लागत आहे. भावनिक भाषणं आणि टोमणे, या गोष्टी आतातरी यांना तारू शकणार नाही. भाजपा मराठीविरोधी आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव आहे. गुजरात्यांना विकण्याची खेळी आहे. वगैरे वगैरे आरोप उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चेल्याचपाट्यांनी केले होते. त्याला भाजपाने हिंदू मराठी महापौर बसेल असे प्रत्युत्तर दिले होते. त्यावर उद्धव ठाकरे यांनी हिंदू आणि मराठी वेगळं आहे का? मराठी हिंदू नाही असे भाजपाला म्हणायचं आहे का? असे प्रश्न उपस्थित केले. त्याचवेळी राज ठाकरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात मराठी महापौर बसेल असे छातीठोक सांगितले होते आणि आता परभणीत काय केलं? जनाब उद्धव साहेबांनी तर चक्क मुस्लिम महापौर बसविला. आता कुठे गेला यांचा हिंदू आणि मराठीचा स्वाभिमान? त्यामुळे आता आपली वैचारिक सुंता झाली आहे हे मान्य करून, स्वतःला उगाच हिंदुत्ववादी वगैरे म्हणू नये. आणि बाळासाहेबांच्या आत्म्याला वेदना होतील असं काही वागू नये. ▮

९२७०३३३८८६

## 'पवारांचा नवा जावईशोध', यथोचित राजकीय विश्लेषण

तरुण भारतच्या ७ फेब्रुवारी २०२६ च्या अंकात 'पवारांचा नवा जावईशोध' मथळ्याखाली नागेश दाचेवारांचा लेख वाचनात आला. हा लेख अत्यंत यथोचित राजकीय विश्लेषण म्हणावे लागेल. मी खरे तर कोणत्याही राजकीय पक्षाची पुरस्कर्ती नाही, पण लेखकानं केलेलं विश्लेषण अगदी योग्य वाटलं. मुख्यमंत्र्यांची जर प्रतिक्रिया ऐकाल तर त्यांनी असं कुठेही म्हटलेलं नाही की विलीनीकरण होऊ नये. उलटपक्षी त्यांनी हेच समजावण्याचा प्रयत्न केला की, राष्ट्रवादी पक्ष सत्तेत असल्यामुळे त्यांनी विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आणला असता एवढेच. त्यांच्या वक्तव्याचा हेतुपुरस्सर विपर्यास केला जातो आहे. हे स्पष्ट करताना लेखकाने संजय राऊतांबद्दल जे म्हटलं, ते अगदी सूर्यप्रकाशाइतकं लख्ख आहे. राऊत सकाळी येऊन बरळतात. त्या घटनांचे खरोखरीच ते प्रत्यक्ष साक्षीदार असतात का हो? कदाचित त्यांना ही मुभा दिली असावी. मला एवढंच सुचवावंसं वाटतं की, विरोधाला विरोध करू नका. उगाच वाद उकरून शब्दरूपी बाण फेकून एकमेकांना घायाळ करण्यापेक्षा महाराष्ट्र राज्यातील ज्वलंत समस्या उदा. आत्महत्या, बेरोजगारी कशा सोडविल्या जाऊ शकतील, यावर गांभीर्याने विचार करा.



**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

## वाचक पत्रे

## राजकारण द्वेषभावनांचे की एकोप्याचे?

लोकशाही व्यवस्थेत राजकारण हे समाजघटनाचं महत्त्वाचं साधन मानलं जातं. राजकारण म्हणजे केवळ सत्ता मिळवण्याचा मार्ग नसून, समाजाला दिशा देण्याची जबाबदारी आहे. परंतु आजचा प्रश्न असा उभा राहतो आहे की, राजकारण हे एकोप्याचं माध्यम राहिलं आहे का, की ते द्वेषभावनांचं व्यासपीठ बनत चाललं आहे? अलिकडच्या काळात राजकीय भाष्यांमध्ये तीव्रता, आरोप-प्रत्यारोप, वैयक्तिक टीका आणि समाजघटकांमध्ये फूट पाडण्याचा कल वाढताना दिसतो. मतभेद असणं हे लोकशाहीचं सौंदर्य आहे; पण मतभेदांमधून मनभेद निर्माण होऊ लागले, तर ती धोक्याची घंटा ठरते. राजकारण जर समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याऐवजी त्यांना वेगळं करण्याचं साधन बनलं, तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. द्वेषभावनांवर आधारित राजकारण तात्पुरता फायदा देऊ शकतं, कारण भावना चटकन पेट घेतात. पण अशा राजकारणाचा परिणाम दीर्घकाळ समाजात अविश्वास, असुरक्षितता आणि तणावाच्या रूपात दिसून येतो. एकोप्याचं राजकारण विकासाला चालना देतं. विविध विचार, धर्म, भाषा आणि संस्कृती यांचा सन्मान ठेवून सर्वसमावेशक धोरणं राबवणं ही खरी नेतृत्वाची कसोटी आहे. राजकारण हे स्वार्थाचं रणांगण नसून, जनहिताचं व्यासपीठ असलं पाहिजे. मतं वेगळी असली तरी मनं वेगळी होऊ नयेत, हीच खरी लोकशाही. आज गरज आहे ती द्वेषाच्या ज्वाला भडकवणाऱ्या भाषणांपेक्षा विश्वासाची वात पेटवणाऱ्या नेतृत्वाची. शेवटी प्रश्न राजकारण्यांपुरता मर्यादित राहत नाही. राजकारण द्वेषाचं की एकोप्याचं हा निवडीचा प्रश्न आहे. आणि ती निवड केवळ नेत्यांची नाही, तर संपूर्ण समाजाची आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

## राहुलबाबांची शिकवणी!

११ फेब्रुवारी रोजी लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली येऊन कृषी इ. उद्योगक्षेत्र, संवेदनशील डेटा, आपली सैन्यदले व देशहित आणि भारतमाता हे विकले... हे विकताना पंतप्रधान महोदय, तुम्हांला थोडीशीही लाज वाटली नाही का? असा फुरोगामी भाषेत घणाघाती हल्ला चढविला! त्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि खासदार निशिकांत दुबे काही कारवाई करीत आहेतच. मात्र स्वतः जामिनावर बाहेर असणारे राहुल गांधी यांचे नीतिधैर्य खरोखरच वाखाणण्यासारखे आहे! यासंदर्भात, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा एक जुना व्हिडीओ फिरत असतो, त्याची आठवण होते. त्यात ते म्हणतात, ...ही इटालियन बाई आमच्या वाजपेयींना देशभक्ती शिकवते...!. तरीदेखील केंद्र सरकारने आत्मपरीक्षण करावे आणि बालादपि सुभाषितं ग्राह्यम हे ध्यानात घेऊन देशभक्ती शिकण्यासाठी राहुलबाबा यांच्याकडे शिकवणी लावावी, असे नम्रपणे सुचवावेसे वाटते! ▮



**अविनाश वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गेवराईत पोलिसांची मोठी कारवाई
# तीन ठिकाणी छापे मारून २.६५ क्विंटल गोमांस जप्त

**तभा वृत्तसेवा**

गेवराई: बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पुकारलेल्या मोहिमेअंतर्गत, आज गेवराई पोलिसांनी शहरात मोठी कारवाई केली आहे. शहरातील खाटीक गल्ली भागात सुरू असलेल्या अवैध गोवंश मांस विक्रीवर पोलिसांनी एकाच वेळी तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत सुमारे ६०,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गोपनीय माहितीवरून पोलिसांची मोहीम पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने, आज सकाळी गेवराई पोलिसांना खाटीक गल्ली भागात गोवंश मांसाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली तीन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. या पथकांनी सकाळी ८:३० वाजेच्या सुमारास संशयास्पद ठिकाणांवर अचानक धाडी टाकल्या.

**कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे**

आयान खलील शेख: याच्या ताब्यातून १४५ किलो गोमांस आणि ५,८०० रुपयांचे इतर साहित्य जप्त करण्यात आले.
अख्तर ईस्माईल कुरेशी: याच्या ताब्यातून ६० किलो गोमांस जप्त करून त्याला ताब्यात घेण्यात आले.
रफीक कुरेशी: याच्या ठिकाणाहून ६० किलो गोमांस जप्त करण्यात आले, मात्र तो पोलिसांची चाहूल लागताच फरार झाला.

दोन आरोपी ताब्यात, एक फरार या छाप्यात पोलिसांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून एकूण २ क्विंटल ६५ किलो गोमांस जप्त केले.

मुद्देमाल नष्ट आणि गुन्हा दाखल जप्त केलेल्या मांसाचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत नमुने घेऊन ते सीलबंद करण्यात आले आहेत. आरोग्याचा धोका टाळण्यासाठी उर्वरित मांस सुरक्षित स्थळी नेऊन नष्ट करण्यात आले आहे. या संपूर्ण कारवाईत गोमांस आणि दुकानातील साहित्य मिळून एकूण ६०,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सध्या गेवराई पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे.

यांनी केली कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, आणि पोलीस उपअधीक्षक श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये सपोनि सतीश कोटकर, सपोनि अण्णासाहेब पवार, सपोनि दिपक लंके, पोह/१३१७ चंद्रसेन माळी, पोह/३७० दिलीप सरवदे, पोह/९५४ हंबर्डे, पोकॉ/२११२ जितेंद्र ओव्हाळ व पोकॉ/२४१ गोरक्ष डोके यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## बीडमध्ये तापमान लवकरच 35 अंशावर पोहचणार

बीड, 14 फेब्रुवारी : जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा कडाका हळूहळू कमी होत असून, आता उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील आठ दिवसात बीड जिल्ह्यातील तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. सामान्यतः फेब्रुवारीच्या अखेरीस जाणवणारा उन्हाळा यंदा मध्य फेब्रुवारीपासूनच अनुभवायला मिळत आहे. सध्या किमान तापमान १५ अंश तर कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअसवर पोहचले आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाला असला तरी बीडला महिनाभरापूर्वीच कडाक्याच्या उन्हाळ्याला सामोरे जावे लागणार आहे. मागील आठवड्यात किमान तापमान



१५ ते १७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते, ज्यामुळे पहाटे सौम्य थंडी जाणवत होती. मात्र, आता वातावरणात बदल झाला असून कमाल तापमान ३० अंशांच्या पुढे गेले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, येत्या २१ फेब्रुवारीपर्यंत जिल्ह्याचा पारा ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकतो. वाढत्या उष्णतेमुळे दुपारी नागरिकांना उन्हाचा त्रास जाणवत आहे. विशेषतः शेती कामांवर याचा परिणाम होत असून, बागायती पिकांना पाण्याची अधिक गरज भासणार आहे. रात्रीचे तापमानही १५ ते १८ अंशांच्या पुढे गेले असल्याने थंडी पूर्णपणे गायब झाली आहे आणि मोठा उकाडा जाणवत आहे.

## श्री दत्त संस्थान बालाघाट येथे महाशिवरात्र उत्सव साजरा होणार


बीड प्रतिनिधी : श्री दत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. प.पु.ष.ब्र. श्री 108 शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज रविवार, दि. 15 फेब्रुवारी 2026 रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्र हा भगवान श्री शंकराचा अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी पहाटे लवकर भगवान श्री शंकरांना विधीवत महारुद्र अभिषेक करण्यात येणार असून, वेदमंत्रांच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे. त्यानंतर महाआरती संपन्न होईल. भाविक भक्तांना अभिषेक व आरतीचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावर्षी विशेष आकर्षण म्हणून संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, संगीत क्षेत्रातील मान्यवर कलाकार उपस्थित राहणार आहेत. बालाघाट डोंगर परिसरात होणारा हा कार्यक्रम भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरणार आहे. तसेच महाशिवरात्र पूर्वकाळात विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येत असून, दिवसभरात महारुद्र अभिषेक, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील तसेच बाहेरील भागातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या पवित्र महाशिवरात्र उत्सवाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

## बीड जिल्हा संगणक टंकलेखन व लघुलेखन संघटनेची बैठक संपन्न



बीड, दि. 12 फेब्रुवारी २०२६ — बीड जिल्हा संगणक टंकलेखन व लघुलेखन संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक संघटनेच्या जिल्हा कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीला राज्य संघटनेचे अध्यक्ष मा. प्रकाश कराळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उपाध्यक्ष आदरणीय श्री. सुभाष नाईकवाडे यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष श्री. अरुण नाळपे, सचिव भागवत ढाकणे व कोषाध्यक्ष रामदास खटाणे यांच्या नियोजित समितीने मार्गदर्शन केले. बैठकीत संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षेत विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे पाठपुरावा करण्याचा ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला. तसेच परीक्षा शुल्कात झालेली वाढ, वाढती महागाई, दुकान भाडे व वीज बिलातील वाढ या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२६ पासून संगणक टंकलेखन व लघुलेखन या शैक्षणिक प्रमाणपत्रासाठी प्रति विषय रुपये ६६०० इतके शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी विद्यार्थ्यांसाठी एलएमएस सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध करून दिल्याबद्दल बैठकीत त्यांचे अभिनंदन करून अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. या सॉफ्टवेअरमुळे विद्यार्थ्यांना टंकलेखन व लघुलेखनाचे कौशल्य अधिक प्रभावीपणे आत्मसात करता येणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच संगणक टंकलेखन व लघुलेखनच्या विविध भरती प्रक्रियेसाठी जास्तीत जास्त होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस नितीन बागलाणे, अशोक गायकवाड, गीते सर, संदीप लाड, सचिन पंडित, बालासाहेब घोडके, रवी नाईकवाडे, विजय चिंचोलकर, संदीप वारे, विनोद थोरात, भिसे सर, प्रा. संजय इंगोले आदी सदस्य उपस्थित होते.

## आरोग्यशिबीर संपन्न,सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचा उपक्रम



केज/प्रतिनिधी : परमपूज्य गुरुमाउलींच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र आदरणीय दादासाहेब यांच्या आदेशानुसार सद्गुरू प.पू.मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समर्थ नगर येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

या शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्गुरू प.पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचे डॉ.मोहनराव गौरकर,डॉ.श्रीकांत सलोने,सौ.अर्चनाताई रमेशराव आडसकर, भारतीय जनता मजदुर संघाचे महाराष्ट्र सचिव पत्रकार धनंजय कुलकर्णी,भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव पत्रकार चंद्रकांत पाटील,ह.भ.प.दिपक महाराज मेटे, अॅड. सौ. राजश्रीताई मुंडे,सौ. बोबडे मॅडम तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरचे डॉक्टर टीम, आरोग्य दूत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे,तसेच गावातील सर्व स्वामीभक्त कार्यकर्ते राजकुमार गुंडेवार,श्रीराम शेटे,आगळे सर,कापरे सर,आळणे सर,विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे विश्वस्त शिवाजीराव कांबळे, वल्लभ दादा राऊत,सोनी साहेब इत्यादी उपस्थित होते.यावेळी सौ. अर्चनाताई रमेशराव आडसकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.व डॉ. मोहनराव गौरकर,यांनी सद्गुरू प.पू.मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर,जनकल्याण योजना व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ महिला,पुरुष, नागरिक,सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हे शिबिर यशस्वी करण्या साठी स्थानिक सर्व कार्यरत सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

### महा पशुधन एक्सोचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पंकजाताई मुंडे यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक
# माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं ; पशुसंवर्धनातून मोठी रोजगार निर्मिती करणार : देवेंद्र फडणवीस
### मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबवणार : पंकजाताई मुंडे

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ : माय आणि मातीशी आमचं घट्ट नातं आहे. आपल्या संस्कृतीमध्ये जे काही चक्र आहे ते सर्व पर्यावरण पूरक आणि नैसर्गिक साखळीला अनुसरूनच आहे. पशुसंवर्धना च्या माध्यमातून येणाऱ्या काळात मराठवाडा विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात नवनवीन प्रयोग, अनुसंधान साधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी प्रभावीपणे काम सुरू केले असून पशुसंवर्धनातून रोजगार निर्मितीसाठी पशुसंवर्धन विभागाच्या सर्व प्रस्तावित नवनवीन योजनांना भरघोस निधी दिला जाईल अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी वैजनाथ येथील महा पशुधन एक्सपो च्या समारंभात दिली. तर भारतात



पशुपालनाला कृषीचा दर्जा देणारे, अतिशय जबाबदार मुख्यमंत्री आपल्याला लाभले असून येणाऱ्या काळात पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून नवउद्योजक तयार करण्यासाठी मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबविणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिली.

पशूसंवर्धन विभागाच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून कालपासून सुरू झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील महा पशुधन एक्सपोचा मुख्य समारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. एक्सपो मधील विविध स्टॉल्सना भेट देत मुख्यमंत्र्यांनी पाहणी केली. व्यासपीठावर ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, आ. रत्नाकर गुट्टे, माजी आमदार बदामराव पंडित,माजी आमदार गोविंद केंद्रे, संजय दौंड, परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी , गेवराईच्या नगराध्यक्षा गीता भाभी पवार , गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा,अक्षय मुंदडा पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, प्रवीण कुमार देवरे डॉ. मुकणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आदींसह नेतेगण, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी चांगले व प्रभावी काम सुरू केले आहे. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी राज्य सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी राहणार आहे. आपलं नातं हे माय आणि मातीशी घट्ट असून त्या दृष्टीने काम करण्याचा आपल्या सरकारचा संकल्प आहे. आपल्या संस्कृतीनेच आपल्याला निसर्ग, माती, पशु, वनस्पती यांच्याशी जोडलेले आहे. त्यामुळे आपल्या प्रत्येक देवते सोबत पशु आणि वनस्पती यांचे अवतार आपल्याला बघायला मिळतात.

## कामगार विरोधी कायदे मागे घ्या व ईपीएस पेन्शन मध्ये वाढ करा- डॉ. संजय तांदळे

**तभा वृत्तसेवा**

बीड( प्रतिनिधी ) : कामगारांनी शंभर वर्षाच्या लढ्यातून कामगारांच्या हिताचे निर्माण केलेले कामगार कायदे मोदी सरकारने रद्द केले आहेत. कामगार विरोधी मालकधार्जीन्या चार श्रमसंहिता लागू केल्या आहेत. वेतन संहिता,औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामकाज परिस्थिती संहिता,जन सुरक्षा कायदा, रद्द करण्यासाठी दिनांक 12 फेब्रुवारी 2026 रोजी देशव्यापी बंद सीटू, किसान सभा, राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक), सेवानिवृत्त ईपीएस राष्ट्रीय समन्वय समिती नवी दिल्ली, शेतमजूर युनियन (लाल बावटा) जाती अंत संघर्ष समिती, आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच, डीवायएफआय, एसएफआय, जनवादी महिला संघटना आदी राष्ट्रीय स्तरावरील विविध संघटनेच्या वतीने पुकारण्यात आला होता. जिल्हा स्तरावरील विविध संघटनेचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने देशव्यापी संपात सहभागी झाले होते. दि. 12 फेब्रुवारी 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निवृत्त कर्मचारी 1995 राष्ट्रीय समन्वय समिती विभागीय तथा बीड शाखेच्या वतीने निदर्शने करण्यात आली. ईपीएस 1995 पेन्शन धारकांना कमीत कमी दहा हजार प्रति महिना पेन्शन देण्यात यावी तथा 1992 कायद्यानुसार 93% असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय देण्यात यावा व राज्यसभा रिपोर्ट 147( 2013 )कायदा त्वरित लागू करण्यात यावा व ईपीएस पेन्शन धारकांना महागाई कमीत कमी दहा हजार रुपये प्रति महिना पेन्शन देण्यात यावी. अशी मागणी निवृत्त कर्मचारी (1995) राष्ट्रीय समन्वय समिती विभागीय तथा जिल्हा शाखेच्या वतीने पंतप्रधान,केंद्रीय कामगार मंत्री ,केंद्रीय अर्थमंत्री यांना दि. 12 फेब्रुवारी 2019 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी सेवानिवृत्त ईपीएस सेवानिवृत्त कर्मचारी समन्वय समितीचे विभागीय तथा जिल्हाध्यक्ष डॉ.संजय तांदळे, सचिव रंजीत डावकर,सुदाम कोळेकर,डी. आर.शेवलीकर भाऊसाहेब फुंदे, दिलीप चिंचोलकर, आर.डी. जोगदंड, सुधीर देशमुख, रामनाथ तांदळे, उपाडे के.पी.,व्ही.के. चाटे, राम आंधळे. मोहन मिसाळ, शेरखान पठाण, शिवकल्याण बारगजे, मुळे आदींची उपस्थिती होती.

## बीड - घरकुल योजनेला गती आणा; नगरसेवकांनी वेळ द्या : पवार

बीड, 14 फेब्रुवारी : घरकुल आवास योजना ही महत्त्वाची आहे. तीन-चार महिन्यांत ती प्रत्यक्षात यावी, यासाठी प्रयत्न करा. निधी कमी पडू देणार नाही. नगरसेवकांनी वेळ दिला, तरच त्यांच्या पदाला अर्थ आहे, असे मत माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केले.

गेवराई नगर परिषद सभागृहात घरकुल योजनेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, रेवतीताई घुंबार्डे, अॅड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील मंजूर व नामंजूर घरकुल प्रकरणांवर चर्चा झाली. लाभमिळालेल्या व अडचणीत असलेल्या लाभार्थ्यांच्या समस्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याधिकारी मांडुरके यांनी मंजूर वप्रस्तावित घरकुलांची माहिती दिली. किती घरकुल पूर्ण झाली, किती प्रगतीपथावर आहेत, याचा तपशील दिला. लक्ष्मण पवार यांनी पंधरा दिवसांनी आढावा बैठक घेण्याचा सल्ला दिला. दोन-तीन ग्रुप करून काम वाटून घ्या, असेही ते म्हणाले. सुरुवात केल्यास लाभार्थी स्वतः कागदपत्रांसाठी मदत करतील, असेही त्यांनी सांगितले.

## बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच श्री सोमेश्वर मंदिर परिसरातील स्वच्छता करा
### नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे पाटील यांचे मुख्याधिकारी नगरपरिषद यांना निवेदन सादर

**तभा वृत्तसेवा**

बीड प्रतिनिधी. : बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच सर्वांच्या नवसाला पावणारे असे बार्शी रोडवरील असलेले श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह व तसेच विविध धार्मिक कार्यक्रम सध्या सुरू आहेत तसेच येणाऱ्या 15 तारखेला हिंदू संस्कृतीतील सर्वात मोठी श्री महाशिवरात्र हा उत्सव साजरा संपूर्ण जगभरामध्ये साजरा होत आहे याच पार्श्वभूमीवर जिल्हा बीड येथील श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर महादेव या ठिकाणी देखील दिल्या चार-पाच दिवसापासून चालू असलेला प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी नियमाप्रमाणे सुरू असलेला श्री अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता व श्री महादेव सोमेश्वर यांची महापूजा श्री महाशिवरात्रीच्या पर्व काळावर मोठ्या थाटामाटा हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे या परिसरातील सर्व जो बाजूच्या परिसराची स्वच्छता मोहीम नगरपालिकेने करावी व ठिकठिकाणी बीड शहरांमध्ये पथदिवे नाही त्या ठिकाणी त्वरित लाईट पथदिवे बसवण्यात यावे तसेच संपूर्ण रस्त्याची स्वच्छता करण्यात यावी तसेच नगरपालिकेच्या वतीने त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात यावी असे विविध प्रश्न घेऊन स्वीकृत नगरसेवक



एडवोकेट गोविंद शिराळे पाटील यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांना निवेदन दिले आहे तात्काळ सर्व बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील स्वच्छता मोहीम नगरपालिकेने राबवावी असे आव्हान देखील यावेळी देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे सर्वांचे सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे नगरपालिकेचे नगरसेवक म्हणून नगरसेवकाचे कार्य काय असते ते आता आपल्या उत्कृष्ट कार्यातून दाखवून देणारे असे उत्कृष्ट वकील एडवोकेट गोविंद शिरोळे पाटील यांनी निवेदन दिले आहे आणि नगरपालिकेला तात्काळ बीड शहरातील विविध धार्मिक स्थळावरील तसेच श्री सोमेश्वर महादेव मंदिर परिसरातील स्वच्छता करण्यात यावी करण महाशिवरात्रीच्या अगोदर ही स्वच्छता व्हावी जेणेकरून येणाऱ्या भाविक भक्तांना कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता नगर परिषदेने घ्यावी असे या निवेदनात म्हटले आहे .

# महाशिवरात्रीपूर्वी परळीत दररोज पाणीपुरवठा करा
### नगरसेवक नितीन बागवाले यांची प्रशासनाकडे ठाम मागणी

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरात सध्या नगरपालिकेकडून पाच दिवसांतून केवळ एकदाच नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना, वृद्धांना आणि लहान मुलांना वणवण भटकावे लागत असून ही परिस्थिती अत्यंत गंभीर व अन्यायकारक असल्याची भावना शहरवासीयांमध्ये व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगर परिषद गटनेते तथा युवा नेते नगरसेवक नितीनभाऊ बागवाले यांनी नागरिकांच्या वतीने परळी नगरपालिकेकडे तात्काळ दररोज पाणीपुरवठा सुरू करण्याची ठाम



मागणी केली आहे. नगरसेवक बागवाले यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नागापूर येथील वाण धरणात सध्या मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. यंदा समाधानकारक पाऊस झालेला असतानाही नागरिकांना पाच दिवसांनी एकदाच पाणी देणे ही प्रशासनाची अक्षम्य चूक असून नागरिकांवर अन्याय आहे.

**हा अन्याय सहन करणार नाही" : नितीन बागवाले**

"नागापूरच्या वाण धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. तरीही पाच दिवसांनी एकदा पाणी देणे ही प्रशासनाची निष्क्रियता आहे. महिला, वृद्ध आणि लहान मुले पाण्यासाठी त्रस्त आहेत. महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक शहरात येणार आहेत. त्यांची गैरसोय होऊ देणार नाही. तात्काळ दररोज व वेळेवर पाणीपुरवठा सुरू करावा; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल."

## ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी स्वतंत्र, हक्काचे वसतीगृह होणार

**तभा वृत्तसेवा**

बीड दि.12 (प्रतिनिधी) : ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतीगृह होणार हा निर्णय संपुर्ण बीड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक झाला आहे. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृहाच्या बांधकामासाठी शासनाकडून भरघोस निधीसह मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आ.संदिप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार तसेच महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

मागील मोठ्या कालावधीपासून बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार या नात्याने बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत ऊसतोड कामगारांची मोठी संख्या लक्षात घेवून त्यांच्या मुला-मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि हक्काचे शासकीय वसतीगृह उभारण्यात यावे या करीता आ.संदिप क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू होता. संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना प्रभावीपणे राबवून ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाची संधी मिळावी. या करीता दुरदृष्टी असलेले दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार यांनी सकारात्मक भुमीका घेत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास सहमती दर्शविली होती. तसेच, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही या कामास मंजुरी देऊन मोठा निर्णय घेतला. बुधवार (दि.11) रोजी शासन निर्णयाव्दारे बीड जिल्ह्यातील 11 वसतीगृह बांधकामाच्या कामास शासनस्तरावरून तब्बल 159.36 कोटी रूपयांच्या भरघोस निधीसह मंजुरी देण्यात आली.

# श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

गेवराई (प्रतिनिधी) : श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत दि.14 वार शनिवार दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधूनप्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप हे होते. तर प्रमुख पाहुणे



म्हणून प्रा. शरद सदाफुल, केंद्रीय मुख्याध्यापक नामदेव शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवासन देवकते, श्री थळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. शरद सदाफुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जिवनात ज्ञान हे शाश्वत ज्ञान आहे इतर काहीही नाही. तसेच शेतकरी, सर्वसामान्य घराण्यातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करुन आपल्या आई-वडीलांच्या कष्टाचे चीज करावे. तसेच शालेय जीवनात मोबाईलचा अतिवापर टाळावा आणि परिक्षाला समोरे जाताना विवेकबुद्धीने आणि शांत मनाने परिक्षेस सामोरे जावे. तसेच भविष्यात जगाच्या पाठीवर कुठेही जा परंतु आपल्या गुरुंना विसरु नका.असा मौलिक सल्लाही यावेळी विद्यार्थींना दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी शाळेची प्रगती व दहावी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत उत्तीर्ण होणारा विद्यार्थ्यींचा दरवर्षीचा अलेख सांगताना आमच्या शाळेतील विद्यार्थी जास्तीत जास्त मार्क प्राप्त करून केद्रातुन प्रथम क्रमांक पटकावत असल्यांचे सांगुण यावेळी आमचे विद्यार्थ्यी हे कमीत कमी तालुक्यातुन प्रथम येण्याचा मान मिळवतील अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर दहावी वर्गातील विदयार्थ्यींनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी मुगुटराव, पुजा गुजर यांनी तर आभार हरीभाऊ आघाव यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ता मोटे, नवनाथ घुगे, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदीसह नववी वर्गातील विद्यार्थींनी सहकार्य केले.

# १५ लाखांचे हरवलेले ७० मोबाईल शोधून मुळ मालकास सन्मानाने केले परत

## पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**

जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांचे गहाळ झालेले मोबाईल शोधून मुळ मालकास परत करण्यासंदर्भात विशेष मोहीम राबवून मोबाईल रिकव्हर करण्याबाबत सूचना सायबर सेल आणि सर्व ठाणेदारांना देण्यात आल्या होत्या. या मोहीमेत १५ लाखांचे ७० मोबाईल पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्याहस्ते सन्मानाने परत करण्यात आले. यावेळी मुळ मालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

सदरील मोहीम पोलिसांनी जिल्हाभरात राबवत जिल्ह्यातून तसेच परजिल्ह्यातून, परराज्यातून रिकव्हर केले आहेत. त्यानंतर पोलिस प्रशासनाने हरवलेल्या मोबाईलचे मुळ मालक किंवा तक्रारदार यांचेशी संपर्क साधून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून सर्व ठाणेदारांच्या मदतीने संबंधित मुळ मालकाचे मोबाईल हस्तगत केले. त्यानंतर दि १४ फेब्रुवारी रोजी येथील पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयात संबंधीत मुळ मालकांना बोलावून त्यांचे गहाळ झालेले किंवा हरवलेले अॅन्ड्रॉईड मोबाईल सन्मानाने परत करण्यात आले आहेत.

यावेळी पोलिस विभागाच्यावतीने नागरिकांना पावतीविना सेकंडहॅन्ड मोबाईल खरेदी करू नये किंवा वापरू नये, मोबाईल हरवल्यास तत्काळ स्वत: किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात जाऊन सीईआयआर पोर्टलवर माहीती भरावी असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी मोबाईल हरवलेले मुळ मालकांना पोलिस अधीक्षक डॉ रोहन आणि अप्पर पोलिस अधीक्षक मीना यांचेहस्ते मोबाईल परत करण्यात आले.

याप्रसंगी पोलिस उपअधीक्षक राजकुमार केंद्रे, कुंदनकुमार वाघमारे, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप मोदे, शामकुमार डोंगरे, सुधीर वाघ, विष्णुकांत गुट्ठे, सहाय्यक पोलिस निरीक्षक संग्राम जाधव, दिपक मस्के, गजानन बोराटे, रामदास निरदोडे, विकास आडे, घार्गे, सायबर सेलचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, अंमतदार दत्ता नागरे, इरफान पठाण, मारोत काकडे, प्रदीप झुंगरे, प्रणिता मोरे यांनी मोबाईल हस्तगत करणेबाबत महत्वाची कामगिरी बजावली आहे.

# पांगरा शिंदे येथे दुग्ध उत्पादकांसाठी बँक कर्ज वाटप मेळावा

## कर्जातून गावात दुधक्रांती अपेक्षित- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**



वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे येथे दुग्ध उत्पादन वाढीसाठी विविध राष्ट्रीयीकृत बँकांच्या माध्यमातून कर्ज वाटप मेळावा उत्साहात पार पडला. मिळालेल्या कर्जातून गावात दूध क्रांती घडेल, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केला.

पांगरा शिंदे येथील रोकडेश्वर मंगल कार्यालयात आयोजित या मेळाव्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँक यांच्या वतीने दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना कर्ज वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, दिनेश कुमार झा, दीपक बारहाते, किरण चांदेरकर, वसमत गट विकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड, अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक सुनील झोडगे, जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रवीण राठोड, नाबार्डचे अविनाश लहाने, सरपंच पूनम शिंदे, दत्तगुरु फार्मर प्रोड्युसर कंपनीचे सूर्याजी शिंदे तसेच शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त गंगाधर शृंगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

या मेळाव्यात हिंगोली जिल्ह्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना ७५ दुधाळ म्हशींसाठी सुमारे १ कोटी ५० लाख रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. तसेच विविध उद्योगांसाठी सुमारे ४ कोटी रुपयांचे कर्ज वाटपही करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, शेती व्यवसायास पूरक जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाला मोठी संधी आहे. बँकांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या कर्जामुळे पांगरा शिंदे गावात दुग्ध उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन आर्थिक उन्नती साधता येईल. शेतकरी बांधवांनी दुग्ध व्यवसायाकडे अधिकाधिक वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बँक ऑफ इंडिया वसमत शाखेचे शालिकराम जाधव, चोंडी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक दैठणकर, भारतीय स्टेट बँक व युनियन बँकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. रमेश चेंडके यांच्या दर्पण दूध उत्पादक प्रोड्युसर कंपनीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास पांगरा शिंदे व परिसरातील दुग्ध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन रमेश चेंडके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर वानखेडे, साईनाथ शिंदे, सोपान मारकळ, सोनबा शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**



शहरात श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ आयोजित करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय कथाकार परम पूज्यनी भाईश्री रमेश भाई ओझा यांच्या मुखातून श्री गजराज बाल गणेश मंडळाने ही कथा आयोजित केली आहे. चैत्र महिन्यातील हिंदू नववर्ष गुढी पाडव्यानिमित्त १९ मार्च ते २५ मार्च या कालावधीत दररोज दुपारी ४ ते ७.३० या वेळेत शहरातील रामलीला मैदानावर हा कथा ज्ञान यज्ञ आयोजित केला जाईल. कथेच्या भव्य आयोजनासाठी १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी उशिरा हिंगोली शहरात संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. शहरातील पोस्ट ऑफिस रोडवरील भवानी कॉम्प्लेक्समध्ये बांधलेल्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त सुरुवातीला भगवान श्री राम, श्री कृष्ण आणि हनुमान यांची पूजा करण्यात आली. त्यानंतर मुख्य यजमान आणि सर्व यजमानांच्या हस्ते रिबन कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर कथेच्या २१ यजमानांसाठी विविध दिवशी पूजेसाठी सोडती काढण्यात आल्या. ज्यामध्ये मुख्य यजमान नंदू शर्मा हे पहिल्या दिवशी यजमानांसह, १९ मार्च रोजी गणेश बागडिया, विनोद चितलांगे, रमेश सोनी, दुसऱ्या दिवशी २० मार्च रोजी यजमान राजकुमार सेंडाने, राजेश जयस्वाल, ताराचंद धुत, २१ मार्च रोजी यजमान नानुराम जांगिड, वीणा गुप्ता, डॉ. नीलेश सोमाणी हे असतील. २२ मार्चचे यजमान रमेशचंद्र बागडिया, पद्माबाई शिंदे, नवनीत राठोड असतील, २३ मार्चचे यजमान अशोक अग्रवाल, सुरेश कलावडिया, संदीप बांगर असतील, २४ मार्चचे यजमान योगेश दुबे, पंकज अग्रवाल, भगवानदास हेडा असतील. २५ मार्चचे यजमान रितेश अग्रवाल, ओम हेडा, कैलाशचंद्र खंडेलवाल असतील. मुख्य आयोजक श्री गजराज बाल गणेश मंडळासह तुलसी मानस मंडळाचे सदस्य, श्री वैष्णव नवदुर्गा मंडळ, विशाल व्यायाम शाळा इत्यादी बैठकीला उपस्थित होते.



**हिंगोली- हिंगोली जिल्हा हौशी सायकलींग असोसिएशन व क्रिडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त येथील तालुका क्रिडा संकुलात मुलींचे कबड्डी स्पर्धेचे सामने घेण्यात आले. या सामन्यांचे उद्घाटन न प चे गटनेते श्रीराम बांगर यांचेहस्ते करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, मनिषा काटकर, विशाखा सोनवणे आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे फेब्रुवारी, २०२६ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १६ फेब्रुवारी) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### अनुसूचीत जाती आयोगाच्या सदस्यांची भेट



हिंगोली- राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी त्यांच्या पथकासह हिंगोली येथे नवीन मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह यांना अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थिनींना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मिळणाऱ्या सोयी-सुविधांबाबत सविस्तर विचारणा करण्यात आली. विद्यार्थिनींनी सकारात्मक दिलेल्या प्रतिक्रिया ऐकून गोरक्ष लोखंडे यांनी सहाय्यक आयुक्त गीता गुट्ठे तसेच गृहपाल सुलोचना ढोणे यांचे कौतुक केले. यावेळी सदस्यांनी उपस्थित सर्व विद्यार्थिनींना सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन करत शिक्षण, शिस्त आणि उपलब्ध शासकीय योजनांचा योग्य लाभ घेण्याचे आवाहन केले.

### अवैध दारू विक्रीविरोधात ११ ठिकाणी छापे

हिंगोली- दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिस विभागाच्यावतीने अवैधदारू विक्री करणाऱ्या ११ ठिकाणी पोलिसांच्या पथकांनी छापे मारले असून ९९६० किंमतीची मुद्देमाल जप्त करीत आरोपींताविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच हिंगोली शहर पोलिस ठाणे आणि कळमनुरी पोलिस ठाण्यांतर्गत अवैध शस्त्र बाळगणाऱ्याविरूध्द कारवाई करीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोनल जैस्वाल फर्स्ट ऑफीसर म्हणून सन्मानित, संस्थेकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**



येथील सरजुदेवी भिकूलाल भारुका आर्य कन्या विद्यालयाच्या एनसीसी अधिकारी सोनल जैस्वाल यांना फर्स्ट ऑफिसर म्हणून कर्नल दिलीप रेड्डी यांच्या हस्ते ५२ महाराष्ट्र बटालियन नांदेड येथे सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी मोठ्या संख्येने एन सी सी अधिकारी व आर्मीचे जवान उपस्थित होते. फर्स्ट ऑफिसर म्हणून पदोन्नती मिळणाऱ्या बटालियन मधील प्रथम महिला असल्याचा बहुमान सुद्धा सोनल सुभाषलाल जैस्वाल यांनी मिळवला आहे.

शाळेत कार्यरत शिक्षिका सोनल जैस्वाल यांनी प्रथम प्रशिक्षण १६ ऑगस्ट ते १३ नोव्हेंबर २०१६ तीन महिन्याचे ग्वालियर येथे पूर्ण केले. या नंतर त्यांनी ११ जुलाई ते ३० जुलाई २०२४ उत्कृष्ट कामगिरी करून ए ग्रेट प्राप्त केला व सेकंड ऑफिसर चे रँक प्राप्त केले. या नंतर राजपत्रात निघाल्या प्रमाणे त्यांना १० फेब्रुवारी २०२६ ला फर्स्ट ऑफिसर म्हणून कर्नल दिलीप रेड्डी आणि सुभेदार मेजर मोहन सिंग यांनी त्यांना रँक प्रदान केले. या पदोन्नती बद्दल संस्थेचे उपाध्यक्ष ओमप्रकाशजी भारुका, सचिव अनिल कुमार भारुका, मुख्याध्यापिका एम एस गुंडेकर, उपमुख्याध्याप यू के येरेकर, पर्यवेक्षक जे एच रीतपूरकर, शाळेतील शिक्षक वृंद आणि विद्यार्थीनी तसेच विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# असहाय्यतेचा गैरफायदा घेत महिलेवर अत्याचार, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**

सेनगाव तालुक्यातील एका गावात महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी त्या महिलेच्या तक्रारीवरून एका व्यक्तीविरूध्द शुक्रवारी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनसार सेनगाव तालुक्यात एका गावामध्ये एक महिला एकटी राहते. त्या महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत बाबू राठोड या व्यक्तीने त्या महिलेशी जवळीक वाढवली. त्यानंतर तिला प्लॉट घेवून तुझ्या नावावर करतो तसेच त्यावर घर बांधून देतो असे आमिष दाखविले. त्यानंतरही त्या महिलेने त्यास दाद दिली नाही. मात्र तुझ्यासोबत लग्न करून तुझा सर्व खर्च करतो असे म्हणत त्याने महिलेला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरही त्या महिलेने त्याला दाद दिलीच नाही.

दरम्यान, सदर महिला ऐकत नसल्याचे लक्षात येताच बाबूने दोन महिन्यापूर्वी महिला घरात एकटी असतांना तिच्या घरात जाऊन तिच्यावर अत्याचार केला. मात्र बदनामीच्या भितीने महिलेने कोणालाही हा प्रकार सांगितला नाही. महिलेने या प्रकाराची वाच्यता केली नसल्याचे पाहून बाबू राठोड यांने पुन्हा एकदा तिच्या घरात जाऊन अत्याचार केला तसेच शिवीगाळ केली.

याप्रकरणात महिलेने थेट सेनगाव पोलिस ठाणे गाठून बाबू राठोड याच्याविरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून बाबू राठोड याच्याविरूध्द सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपअधीक्षक राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक मस्के, उपनिरीक्षक रविकिरण खंदारे, जमादाद सुभाष चव्हाण यांच्या पथकाने धटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. आरोपीच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

# धम्म परिषदांच्या माध्यमातून सुसंस्कृत समाज घडविण्याचा प्रयत्न-डॉ महास्थवीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ फेब्रुवारी**

समाजात वाढत असलेले व्यसनधीनता, अज्ञान, अंधश्रद्धा दूर करून सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी भिकू संघ ठिकठिकाणी धम्म परिषदांचे आयोजन करते असे प्रतिपादन अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्यध्यक्ष डॉ.उपगुक्त महास्थवीर यांनी केले. हिंगोली येथे आयोजित धम्म परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

शहरानजीक असलेल्या बळसोंड, अंधारवाडी परिसरातील शांतीनगर येथे जेतवन प्रशिक्षण केंद्र परिसरात १२ फेब्रुवारी गुरूवार रोजी २४ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्मपरिषदेचे उद्घाटन डॉ. उपगुक्त महास्थवीर त्यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी भंते धम्मसेवक महास्थवीर होते यावेळी प्रमुख धम्म देसना भंदत ज्ञानरक्षीत,भंते प्रा. डॉ. सत्यपाल महाथेरो, भंते दयानंद महाथेरो, भंते डॉ. इंदवस महाथेरो, भदंत शिलधमो, भंदत सुभुती,भंते दिपंकर,भंते नागसेन. भंते दीपरत्न,धम्म देशना झाली.राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी उद्घाटन पर भाषणात पुढे बोलताना भंते डॉ.उपगुक्त म्हणाले की, समाजातील ढोंगी मंडळींनी आपल्या वर्तनात बदल करून धम्म समजून घ्यावा आणि त्या पद्धतीने आचरण सुरू करावे. नाटकी आणि दिखाऊपणा त्यागुन सत्य वर्तन अंगीकारावे. पंचशीलाचे पालन करावे त्यामुळे सर्व मानव लोकांचे कल्याण होते असे प्रतिपादन त्यांनी केले. तर अध्यक्ष समर्पक तब्बल दोन तास धम्मदेशना देत पूज्य भंते धम्म सेवक महास्थवीर यांनी विविध उदाहरणे देत तथागत बुद्धाने सांगितलेला सम्यक मार्ग व बुद्ध तत्त्वज्ञान केवळ बौद्धांसाठी नसून या पृथ्वीतलावरील प्रत्येक मनुष्यांसाठी मार्गदर्शक आहे. त्या मार्गावर चालल्यास मानव जातीचे कल्याण होते हे पटवून दिले. प्रसंगी मुख्य संयोजक भंते पंय्यारतन थेरो यांनी प्रास्ताविकात कालकथीत भंतेजी काश्यप यांनी सुरू केलेली धम्म परिषदेची पुढील वर्षी तारीख बदलण्याचा व त्यांचा पुतळा उभारण्याचा संकल्प बोलून दाखविला.

या धम्मपरिषदेतून विविध ठिकाणचे बौद्ध भिक्कूनी उपस्थित होते त्या मध्ये प्रामुख्यानेभंते धम्मबोधी थेरो, भंते धम्मानंद थेरो, भंते धम्मधर थेरो, भंते महाविरो थेरो, भंते मुदीतानंद थेरो, भंते पंय्याबोधी थेरो, भंते अस्सजी थेरो, भंते संघरत्न थेरो,भन्ते पय्यावर्धन, भन्ते कमलबोधी, भन्ते शील ज्योती, भंते पय्यानंद थेरो, भंते शिलरत्न थेरो, भंते सुभुती थेरो, भंते संघपाल थेरो, भंते सारीपुत, भंते बोधिधम्मा, भंते रेवतबोधी, भंते चंद्रमणी, भंते धम्मघोष, भंते सुगतबोधी, भंते बुद्धभूषण, भंते पय्यारक्षित, भंते पय्यावर्धन, भंते पय्यावंत, भंते संघरत्न, भंते पय्यामाल, भंते पय्यासार , भंते पय्यादिप, पंय्याजीत, भन्ते अमीसद्द थेरो,भन्ते सुमेध बोधि, भन्ते संघ सेन, भन्ते सारिपूत, भन्ते पटिसेन, भन्ते संघरत्न, भन्ते चंद्रमुनी, भन्ते मैत्रेयबोधी, विनीतधम्म,अंगुलीमाल भिक्कूनी महानंद, भिक्कूनी सामावती, भिक्कूनी धम्म नंदनि, भिक्कूनि धम्मसेविका, भिक्कूनी विश्वमित्रा, भिक्कूनि उपचला, भिक्कूनि कुशावती, भिक्कूनि धम्मिका आदींसह धम्मपरिषदेत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धम्म परिषदेचे सूत्रसंचालन पत्रकार प्रकाश इंगोले यांनी तर शेवटी आभार नंदकिशोर कांबळे यांनी मानले. परिषदेत विविध ठराव पारित करण्यात आले. राष्ट्रगीताने धम्म परिषदेची सांगता झाली.

रात्री बुद्ध- भीम प्रेरणा गित गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. धम्म परिषदेच्या यशस्वीतेसाठी सुप्रिया महिला मंडळ व शांतीनगर भागातील युवकांच्या वतीने परिश्रम घेण्यात आले यावेळी भिख्खू संघास भोजन दान उद्धव इंगोले परिवाराच्या वतीने करण्यात आले. तर परिषदेस आलेल्या नागरिकांना यशसिद्धी महार रेजिमेंट माजीसैनिक संघटना व भीम के दिवाने मित्र मंडळ सिद्धार्थनगर च्या वतीने खिचडी वाटप करण्यात आली.महसूल कर्मचारी संघटनेच्या चहा व दुध वाटप करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने पाणी वाटप करण्यात आले.



नांदेड- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज मुंबई येथून विमानाने नांदेड येथील श्री गुरु गोबिंद सिंघ जी विमानतळावर आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन प्रसंगी आमदार राजेश पवार, यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, नांदेड परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार तसेच महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते.

# आई-वडिलांच्या कष्टांचे सोनं; देगलूरचा राहुल दासरवार झाला 'डॉक्टर'!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १४ फेब्रूवारी-**

जिद्द, चिकाटी आणि आई-वडिलांच्या आशीर्वादाच्या बळावर देगलूरच्या टेकळे परिवाराचा भाचा राहुल राजकुमार दासरवार यांनी पीएच.डी. पदवी संपादन करत आपल्या कुटुंबाचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. संस्कारी व कष्टाळू कुटुंबातून आलेल्या या अभ्यासू युवकाने अथक परिश्रमांच्या जोरावर यशाचे शिखर गाठत आई-वडिलांच्या त्यागाचे सार्थक केले आहे.

राहुल यांनी Synthesis, Characterization, Physical and Catalytic ctivity of Some Ordered Mesoporous Metallosilicate Materials या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनात ऑर्डर्ड मेसोपोरस मेटालोसिलिकेट पदार्थांचे संश्लेषण (Synthesis), त्यांची संरचनात्मक व भौतिक वैशिष्ट्ये (उहरीरलींशीळरींळेप रपव झहूीळलरश्र Properties) तसेच विविध रासायनिक अभिक्रियांमधील उत्प्रेरक कार्यक्षमता (Catalytic ctivit) यांचा सखोल आणि वैज्ञानिक अभ्यास करण्यात आला आहे. हरित रसायनशास्त्र (Green Chemistry) आणि शाश्वत औद्योगिक प्रक्रियांना चालना देणारे हे संशोधन भविष्यात औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे.



लहानपणापासूनच राहुल हे अभ्यासू, नम्र, आज्ञाधारी आणि जबाबदार स्वभावाचे होते. घरातील परिस्थितीची जाणीव ठेवत आणि आई-वडिलांच्या कष्टांचे भान मनात बाळगत त्यांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. प्रयोगशाळेत तासन्तास केलेले संशोधन, अपयशावर मात करण्याची तयारी आणि न थकणारी जिद्द यामुळेच त्यांनी पीएच.डी.चे स्वप्न पूर्ण केले.

विशेष म्हणजे, त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन निबंध सादर केले असून विविध नामांकित जर्नल्समध्ये त्यांचे संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या संशोधनाची शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात दखल घेतली जात आहे. राहुल यांचे वडील साधे, भोळे आणि प्रामाणिक स्वभावाचे असून मुलाच्या शिक्षणासाठी त्यांनी नेहमीच पाठिंबा दिला. आईने प्रेम, जपणूक आणि त्यागातून मुलाला घडवले. मुलगा 'डॉक्टर' झाल्याची बातमी कळताच आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आमचा राहुल डॉक्टर झाला असे म्हणताना त्यांच्या आवाजातील अभिमान प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्शून गेला.

या उल्लेखनीय यशाबद्दल टेकळे परिवारातील वडीलधारी मंडळी, नातेवाईक आणि मित्रपरिवार यांनी राहुल यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, मार्गदर्शक प्राध्यापक तसेच विद्यापीठ प्रशासनानेही त्यांच्या संशोधनकार्याचे कौतुक करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. राहुल राजकुमार दासरवार यांचे हे यश आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कष्ट, संस्कार आणि चिकाटी यांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, याची ही जिवंत साक्ष आहे. देगलूरच्या मातीतून उगवलेली ही यशोगाथा आज अनेक तरुणांना स्वप्न पाहण्याची आणि ते पूर्ण करण्याची नवी ऊर्जा देणारी ठरली आहे.

## चांडोळा बँकेचा कोळगांव येथे साक्षरता मेळावा

**आदमपूर-**मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा 'वित्तीय साक्षरता कॅम्प' हा मौजे कोळगांव येथे आर्थिक साक्षरता जागरूकता मेळावा शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी रोजी बँक पदाधिकारी व बँकेच्या ग्राहकांसमवेत संपन्न झाला. या बँक मेळाव्याचा मुख्य उद्देश लोकांना बँकिंग,बचत, कर्ज, बजेट,विमा, डिजिटल पेमेंट,प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना,प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना आदि सरकारी योजनांची माहिती देणे हा आहे.सदरील कार्यक्रमातून ग्राहकांना पैसे व्यवस्थापित करण्याची योग्य माहिती होऊन ते आत्मनिर्भर आर्थिक निर्णय घेऊ शकतात. यावेळी चांडोळा शाखा व्यवस्थापक प्रफुल्लकुमार पुंडगे,बँक सहाय्यक महमदरफी मदार,बँक सखी राणी येळगे,सीआरपी मंगल जाधव,बीसी मदन पाटील, कोळगांव सरपंच राजाबाई श्रीरामे,ग्रामसेवक गोपवाड व्यंकट,ग्रामपंचायत सदस्य गोविंद श्रीरामे,सामाजिक कार्यकर्ते केरबाजी गायकवाड,सोसायटी चेअरमन देविदास पाटील,नारायण वडजे,बाबूराव गायकवाड व समस्त गावकरी मंडळी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## आ. चिखलीकर यांच्या हस्ते आज विविध विकास कामाचे भुमीपुजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ फेब्रूवारी-**

कंधार तालुक्यातील विविध गावातील विकास कामांचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्या दिनांक १५ फेब्रुवारी रोजी भूमिपूजन करण्यात येणार आहे . यात अनेक धार्मिक स्थळांच्या सुशोभीकरणाचे आणि मूलभूत पायाभारणीच्या कामांचा समावेश आहे.

महाशिरात्रीच्या शुभ मुहूर्तावर कंधार लोहा विधानसभेचे आ. प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते फुलवळ येथील महादेव मंदिर येथे सकाळी दहा वाजता देवस्थान संरक्षण भिंत व परिसर सुधारणा करणे रु.५०.०० लक्ष, सकाळी ११.३० वाजता बोरी (बु.) महादेव मंदिर देवस्थान परिसरात स्ट्रीट लाईट बसविणे रु.५०.०० लक्ष, दुपारी १.०० वाजता बारुळ ता.कंधार जि.नांदेड महादेव मंदिर परिसरात स्ट्रीट लाईट बसविणे रु.२५ लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी प्रवीण पाटील चिखलीकर संचालक ना.जि.म.स.बँक.नांदेड, सौ.प्रणिताताई देवरे - चिखलीकर माजी जि.प.सदस्या,मनोहर पाटील तेंलग माजी जि.प.सदस्य, बाबुराव गिरे माजी जि.प.सदस्य,बाबुराव केंद्रे माजी संचालक कृ.उ.बा.स.कंधार, शंकरराव नाईक उपसरपंच बारुळ, दत्ता डांगे चेअरमन से.स.सो. फुलवळ, नागनाथराव मंगनाळे सरपंच फुलवळ, बालाजी देवकांबळे, बालाजी झुंबाड माजी संचालक मोहनराव वडजे बोरी (बु.) आदीची उपस्थिती राहणार आहे.

# माळाकोळी पोलिस स्टेशन अंतर्गत आष्टुर परिसरात तिर्रट नावाच्या पत्याचा डाव राजरोसपणे चालू

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १४ फेब्रूवारी-**

माळाकोळी पोलिस स्टेशन अंतर्गत आष्टुर परिसरात अंतर जिल्हा तिर्रट नावाच्या पत्याचा डाव राजरोसपणे सुरू आहे या खेळाकडे सहय्यक पोलिस निरीक्षक ऑक्शन मोडवर न राहाता आर्थिक मोडवरच दिसुन येत आहेत. या परिसरातील अनेक तरुणांनी बिट जमादार यांच्याकडे तोंडी सांगून यावर पायबंद घालावे असे अनेकवेळा सांगीतले पण तिर्रट नावाच्या पत्याचा डावाला पावबंद केले नाही.

या परिसरात अंतर जिल्ह्यातील कुशल खेळाडुचा राजरोसपणे लोंढा वाढताना दिसुन येत आहे असे अनेक तरुणांनी गुप्तपणे बोलुन दाखवले आहे

यावर पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप व जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कंधार उपविभागीय पोलिस अधिकारी यांना आदेश देऊन या ठिकाणी रंगत असलेल्या तर्रट नावाच्या पत्याच्या खेळाला पावबंद करावे.अशी अनेक तरुणाची मागणी जोर धरत आहे.

लोहा तालुक्यातील मंदिर शिल्पकाराचे गाव कोणते तर माळाकोळी आदराने सांगितले जाते.या गावाची अंतर राज्याला मंदिरे बांधनारे गाव म्हणून ओळखिले जाते., हे गाव तालुका लोह्या पासुन १२ किमी अंतरावर माळाकोळी गाव आहे.नागपुर ते तुळजापूर ३६१ राष्ट्रीय महामार्गावरील महादेव बाराज्योर्तिर्लिंग चे प्रसिद्ध देवस्थान आसलेले माळाकोळी गावाची नकाशात नोंद .दक्षिण भारतातील प्रसिद्ध असलेल्या माळेगांव याञेने माळाकोळीची ओळख आहे आणि माळाकोळी जि.प.सर्कल आसल्याने पोलिस स्टेशन अंतर्गत परिसर दक्षिण ते उत्तर खेडकरवाडी ,माळेगांव ,घोटाका, आंडगा ,लिबोटी ,चौंडी परिसर आहे पुर्व पश्चीम परिसर लव्हराळ, आष्टुर, रिसनगाव ते उबरज बोरी(खु),डोंगरगाव, वागदरवाडी, मजरा, ह्या परिसरा पर्यंत माळाकोळी पोलिस स्टेशन च्या हाद्दीत गावे आहे. माळाकोळी हे मध्यभागी गाव आसल्याने जुने पोलिस स्टेशन आसल्याने माळाकोळी, माळेगांव आष्टुर,सावरगाव,यात

चार बिट आहेत, पोलिस स्टेशनच्या आष्टूर बिटा मध्ये तिर्रट नावाचा खेळ खेळवला जात आहे या खेळावर अंतर जिल्हा कुशल खेळाडु दाखल होत असल्याने या खेळातुन झटपट श्रीमंत होता येते या आशेने अनेक होतकरु विद्यार्थी ,अनेक बेकार नव तरुन ,नव्याने लग्न झालेले, नव विवाहित तरुन हा खेळ खेळुन अनेकांचे घर संसार बरबाद झाले व उध्वस्तही झाले .अनेक नवविवाहित तरुणीच्या नशिबी ऐन तारुण्यात कपाळावरील कुंकू लपवण्याची वेळ आली आहे .या परिसरातील तरुण वर्ग व्यसनाच्या आहारी गेला आहे. यामुळे नांदेड पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप व जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी लक्ष घालून अनेक तरुणाचे बरबाद होणारे आयुष्याला कलाटणी द्यावी या खेळाला पावबंद करण्यासाठी तात्काळ कंधार उपविभागीय पोलिस अधिकारी यांना आदेश देऊन आष्टुर येथे तर्रट नावाचा अंतर जिल्ह्यातील कुशल खेळाडू टोळीला पायबंद करावे अशी अनेक गुप्त तरुणाची मागणी वाढत आहे.

## सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी बापूसाहेब पाटील

**नांदेड-**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने व खा. रवींद्र चव्हाण यांच्या शिफारसीने सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी बापूसाहेब पाटील यांची निवड करण्यात आली असून शनिवार (ता.१४) रोजी काँग्रेस पक्ष कार्यालय येथे खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार ओबीसी प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे आदीसह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ व २० या भागाचा समावेश असलेल्या सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी जिल्हाप्रवक्ते तथा अर्धापूर तालुका काँग्रेस कमिटीचे प्रभारी बापूसाहेब पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खा. रवींद्र चव्हाण यांच्या शिफारशी नंतर, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने काँग्रेस प्रदेश कार्यालयाकडून बापूसाहेब पाटील यांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले. दरम्यान पक्ष कार्यालय येथे शनिवार (ता.१३) रोजी नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, प्रदेश सरचिटणीस अँड. सुरेंद्र घोडसकर, कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर, नगरसेवक सत्यपाल सावंत, पप्पू पाटील कोंडेकर, सुरेश हाटकर, बालाजी चव्हाण, कुमार कुर्तडीकर, अजिज कुरेशी, गोविंद बाबा गोंड, अंबादास रातोळे, शंकर शिंदे, गोविंद पाटील, प्रकाश दिपके, अझहर भाई, आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र पत्रकार संघ नांदेड जिल्हाध्यक्षपदी अयुबखान यांची नियुक्ती

**नांदेड -**जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक सत्य मराठी व हिन्दी साप्ताहिक लोकसहाराचे संपादक अयुबखान पठाण यांची महाराष्ट्र पत्रकार संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे जाहीर पत्रक राज्याध्यक्ष विलासराव कोळेकर यांनी काढले आहे. त्यांच्या निवडीचे स्वागत ज्येष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंढरीनाथ बोकारेसह प्रा.डॉ. मुजावर सर, दै. नांदेड चौफेरचे संपादक आरेफखान पठाण, दै. समीक्षाचे संपादक रूपेश पाडमुख व त्यांच्या असंख्य मित्रपरिवारातून होत आहे. अतिशय सामान्य परिस्थिती व कुठल्याही शक्तीचे पाठबळ नसताना व्यावसायिक क्षेत्रातून राजकीय व सामाजिक जनसंपर्क वाढला. या द्वंद्व कार्याला आधार म्हणून पत्रकारितेत प्रवेश केला. प्रारंभी अधिनस्त पत्रकार म्हणून लिखाण केले. परंतु त्यात निष्पक्ष व निर्भीड पत्रकारिता करण्यास येणाऱ्या निर्बंधामुळे स्वतःतच संपादकाचा उदय केला. आज दै सत्य मराठी व न्यूज चॅनलच्या माध्यमातून समाजभान जपत, मुक्त पत्रकारिता व निस्वार्थ समाजसेवा करून त्यांनी जिल्ह्यात स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे.

## भागवतकार लक्ष्मीकांत रवंदे यांना मातृशोक

**नांदेड-**सिडको येथील स्वरचंद प्रतिष्ठान गायन वादन विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तथा भागवतकार लक्ष्मीकांत रवंदे यांच्या मातोश्री जेष्ठ महिला किर्तनकार ह.भ.प.आनंदिबाई मोरेश्वरराव रवंदे यांचे वर्धपकाळाने त्यांचे राहते घरी गोपाळचावडी येथे दिनांक १४ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले. मुत्यु समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ६ वाजता गोपाळचावडी येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुली, दोन मुले, जावई ,सूना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.



## बालाजी धारोजी पंडित यांचे निधन

**नांदेड -**बालाजी धारोजी पंडित वय ७० वर्ष राहणार गंगाचाळ हल्ली मुक्काम शुभम अपार्टमेंटपीव्हीआर मॉल च्या मागे यांचे दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०:३० वाजता निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी एक वाजता गोवर्धन घाट येथील शांतीधाम येथे संपन्न झाला. यावेळी नातेवाईक ,मित्रमंडळी ,व्यापारी, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले आणि एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते शैलेश ट्रेडिंग कंपनी, संतकिरपा मार्केट जी .जी .रोड नांदेड चे मालक शैलेश पंडित यांचे वडील होत.



## स्वच्छता, दिवाबत्तीसह विविध मागण्यासंदर्भात काँग्रेस पक्षाकडून निवेदन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १४ फेब्रूवारी-**




पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरात स्वच्छता, दिवाबत्ती आणि सायरनची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर परिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच चमकुमढी व्यापारी संकुलास भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी काँग्रेस पक्षाची ठोस भूमिका घेण्यात आली आहे.

मुस्लिम बांधवांना रोजा काळात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रमजान महिन्यात पहाटे 'सहरी'च्या वेळी नागरिकांना जाग येण्यासाठी सायरनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच मशिदी परिसरात व मुख्य रस्त्यांवर स्वच्छता मोहीम राबवून दिवाबत्ती सुरळीत ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच निवेदनात देगलूर येथील चमकुमढी व्यापारी संकुलास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी ठाम भूमिका काँग्रेस पक्षाने मांडली आहे. सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचे प्रतीक म्हणून व्यापारी संकुलाला त्यांचे नाव देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

तसेच शहरातील दर्ग्याशी संबंधित जमीन मूळ दर्गा संस्थेकडे हस्तांतरित करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाबाबत पारदर्शकता व न्याय्य निर्णय व्हावा, यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केली.

यावेळी विरोधी पक्षाचे गटनेता मिरामोहिय्योद्दीन, स्विकृत सदस्य अविनाश निलमवार, नगरसेवक शत्रुघ्न वाघमारे, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, नगरसेवक मोहित्तोद्दीन रफाई, यांच्यासह काँग्रेस पक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी व प्रमुख नेते उपस्थित होते. शहरातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवत सर्व समाजघटकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असा इशारा देखील देण्यात आला.

# उमरी तालुकास्तीय क्रिडा स्पर्धेत बितनाळ शाळा नंबर एकं

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १४ फेब्रूवारी-**

उमरी तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत बितनाळ जि प केंद्रिय प्राथमिक शाळा बितनाळ चे विद्यार्थी विविध खेळा गुणाच्या स्पर्धेत नंबर वन पारितोषक पटकावून शाळेचे व गावचे नाव रोषण केले आहे त्यामुळे बितनाळ येथिल गावकरी यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान करून गौरव सोहळा साजरा करण्यात आला आहे.



उमरी तालुक्यात ग्रामिण व शहरी शाळेच्या विद्यार्थीचे क्रिडा गुण कौशल्य वाढावे म्हणून गटशिक्षण अधिकारी सतिश दर्शनवाड जिरोणेकर यांच्या मार्गदर्शनानुसार नवरंग तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा घेण्यात आली .

या खेळामध्ये विविध शहरी व ग्रामिण शाळेतील विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात या स्पर्धेत भाग घेतला होता . या स्पर्धेत कबड्डी , खो - खो , लांब उडी , उचं उडी , धावणे , निबंध स्पर्धा अशा विविश विद्यार्थी विकसीत कौशल्य गुणाचा या स्पर्धेचा समावेश होता .

उमरी तालुक्यातील बितनाळ जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा ही गेल्या पाच वर्षात सामाजिक सलोखा राखून , स्वच्छता , पर्यायवातावरण , शैक्षणीक गुण दर्जा , सांस्कृतिक सामाजिक उपक्रम , मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळेत ही तालुका स्तथरावर प्रथन जिल्हा स्तरावर व्दितीय मानाचे पुरस्कार पटकाविले आहेत .सन फ्रेबुवारी २०२६ रोजी घेतलेल्या तालुका स्पर्धेत बितनाळ शाळेचे विद्यार्थी सहभाग घेवून अक्षरशा : विविध खेळात प्रथम येवून बक्षीसाचे पाऊस पाडला आहे . त्यामुळे बितनाळ गावकरीच्यां वतिने विद्यार्थी व शिक्षक यांचा १२ फेब्रुवारी रोजी २०२६ रोजी कौतुस्पद सत्कार मान सन्मान करण्यात आला . यावेळी गटशिक्षण अधिकारी सतिश दर्शनवाड , शिक्षण विस्तारअधिकारी शंकर बेळकोणे , केंद्रप्रमुख चांडोरीकर , मुख्याध्यापक मोरे , सरपंच प्र मारोतो उमाटे , माजी सरपंच प्र मारोती वाघमारे , उपसरपंच प्र देविदास आकमवाड , कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्र गणेश आन्नेमवाड , शालेय समिती अध्यक्ष - नागनाथ घुमलवाड , पोलिस पाटील बाळासाहेब पल्लेलवाड , गाव रोजगार अधिकारी राजू डूबुकवाड , छत्रपती शिवाजी महाराज हायस्कुलचे मुख्याध्यापक बी डी कदम , मिस्त्री सय्यद फेरोज , शिवनखेडकर सर , केशव सुर्यवंशी , फेरोज सय्यद ,शेळके सर , पेन्डलवाड , मोटरवार सर , सौ मोरे मॅडम , सौ शेळके मॅडम , ' सौ देशमुख मॅडम , आदी मान्यवर उपस्थित होते .

# किनवट तालुक्यातील डोंगरगाव येथे हातभट्टी दारू निर्मिती अड्ड्यावर पोलिसांची मासरेड

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १४ फेब्रूवारी-**

किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोधडी बिट परिसरातील मौजे डोंगरगाव येथे हातभट्टीची गावठी दारू गाळून तिची चोरटी विक्री करणाऱ्या इसमावर पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत सुमारे ६०० लिटर मोहफुलाचे फसफसते रसायनयुक्त द्रव्य जप्त करण्यात आले असून अंदाजे ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे.

दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या आदेशानुसार पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रदिप आत्राम, सिद्धार्थ वाघमारे तसेच महिला पोलीस कॉन्स्टेबल मंजू पवार यांच्या पथकाने



बोधडी बिट भागात मासरेड मोहिम राबविली.

सकाळी सुमारे ९.३० वाजता गुप्त बातमीदारामार्फत मौजे डोंगरगाव येथे एका इसमाने आपल्या शेतातील घराच्या अंगणात हातभट्टीची दारू तयार करून विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार दोन पंचांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला.

छाप्यादरम्यान आरोपी मोतीराम नागोराव हुरदुके (वय ४५ वर्षे, व्यवसाय शेती, रा. डोंगरगाव ता. किनवट जि. नांदेड) हा इसम आपल्या ताब्यात तीन निळ्या रंगाच्या २०० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक टाक्यांमध्ये एकूण ६०० लिटर मोहफुलाचे फसफसते, आंबट व उग्र वासाचे रसायनयुक्त द्रव्य साठवून ठेवताना आढळून आला. सदर द्रव्याची एक १८० मिली क्षमतेची बाटली नमुना म्हणून पंचांसमक्ष सील करून रासायनिक विश्लेषणासाठी जप्त करण्यात आली. उर्वरित दुर्गंधीयुक्त व नाशवंत द्रव्य पंचनामा करून जागीच नष्ट करण्यात आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस कॉन्स्टेबल संजय दिंगाबर रांजणे (पो.स्टे. किनवट) यांच्या फिर्यादीनुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) व (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बीट जमादार सिध्दार्थ वाघमारे हे करीत आहेत. किनवट पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात हातभट्टी दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून बेकायदेशीर दारू व्यवसायावर पोलिसांकडून कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गोदावरीचे जल घेऊन पैठणचे भाविक वृद्धेश्वरकडे

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १४ फेब्रुवारी :** महाशिवरात्रीच्या पर्वावर दरवर्षीप्रमाणे पैठणचे शिवभक्त हे कृष्णकमल तीर्थ गोदावरी नदीचे पवित्र जल तिसगाव जवळील म्हातारा महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या वृद्धेश्वर महादेवाच्या पिंडीवर अर्पण करणार आहेत.

पैठण ते वृद्धेश्वर दिंडीचे यंदा ३८ वर्ष असून या पायी दिंडीत माजी नगरसेवक भूषण कावसनकर,शंकर घोडके,ऋषिकेश ख्रिस्ती, दिनेश ठोंबरे, सारंग आसोलकर संदीप कस्तुरे, आश्विन गोजरे, योगेश गोजरे, रोहित तरटे, महेश ठोंबरे, योगेश जोजारे, सतीश मुळे, सचिन शेठ सारडा,पवन जोशी, मल्हार ख्रिस्ती श्री आखेगावकर, पद्माकर जोशी गोकुळ वरकड हितेन सराफ, पियूश सराफ,प्रदीप देशपांडे, डॉ. पांडुरंग मोरे, उमेश परदेशी, दिलीप रावस,काळे फासाटे आदी शिवभक्तांनी सहभाग घेतला आहे.



## थोडक्यात...

### महाशिवरात्री विशेष: भूमिकेला महादेवांचा आशीर्वाद - जयशंकर त्रिपाठी

**छत्रपती संभाजीनगर :** हे भगवान... कितना बदल गया इंसान! या एण्ड टीव्हीवरील आगामी मालिकेत महेश शर्माची भूमिका साकारताना अभिनेता जयशंकर त्रिपाठी यांनी ही संधी महादेवांचा आशीर्वाद असल्याची भावना व्यक्त केली. निस्सीम शिवभक्त असलेल्या त्रिपाठींसाठी यंदाची महाशिवरात्री विशेष ठरत असून, बालपणापासून ते उपवास, जप आणि रात्रभर भजनाची परंपरा पाळत असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या वैयक्तिक श्रद्धेशी सुसंगत भूमिका साकारण्याची संधी मिळणे हे दैवी मार्गदर्शन असल्याचा त्यांचा विश्र्वास आहे. मालिकेचे सर्व भाग एण्ड टीव्ही तसेच हिंदी झी५वर उपलब्ध होणार आहेत.

### महाशिवरात्री: झी टीव्ही कलाकारांची शिवभक्ती व्यक्त

**छत्रपती संभाजीनगर :** महाशिवरात्रीनिमित्त झी टीव्ही वरील लोकप्रिय कलाकारांनी भगवान शिवांप्रती असलेली श्रद्धा व्यक्त केली. सोनाक्षी बत्रा, प्रिया ठाकूर, मोहक मटकर, वंदना पाठक, अभिषेक शर्मा, इंदिरा कृष्णा, जयती भाटिया आणि अक्षिता मुद्गल यांनी भोलेनाथावरील विश्र्वासामुळे जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळत असल्याचे सांगितले. त्यांच्या मते महाशिवरात्री हा केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून आत्मचिंतन, मानसिक स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. उपवास, मंत्रजप व अभिषेकाद्वारे ते श्रद्धा व्यक्त करतात. भगवान शिवांचे आशीर्वाद संकटांवर शांततेने मात करण्याची शक्ती देतात, असे कलाकारांनी नमूद केले.

### अभिनेत्री गुलकी जोशी दिसणार महत्त्वपूर्ण भूमिकेत

**मुंबई:** सोनी सब आपल्या आगामी वैद्यकीय नाटक हुई गम्म यादें - एक डॉक्टर, दोन जिंदगीयाँ सादर करण्यास सज्ज आहे. हे जागतिक स्तरावर प्रशंसित इटालियन मालिके डीओसी चे भारतीय रूपांतर असून, अनेक देशांमध्ये यशस्वीपणे सादर झाले आहे. दुसऱ्या संधीच्या संकल्पनेवर आधारित ही कथा तेजस्वी डॉक्टर देव (इकबाल खान) यांच्या असामान्य प्रवासाची आहे, ज्यांना अपघातानंतर आठ वर्षांची स्मृती गमावली आणि त्यानंतर त्यांनी आपले जग पुन्हा उभारले.

### ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया चे पहिले आवृत्ती

**मुंबई:** भारतातील एअर कार्गो आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी २०२६ मध्ये अधिक व्यापक आणि विविधतापूर्ण व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. एअर कार्गो इंडिया २०२६ ने आपल्या मागील आवृत्तीच्या तुलनेत ४३ टक्क्यांनी प्रदर्शनी क्षेत्र वाढवले असून, त्याचबरोबर ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया या नव्या प्रदर्शनाचे पहिले आवृत्ती आयोजित करण्यात येत आहे. हा संयुक्त कार्यक्रम २५ ते २७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार असून आयोजन मेस्से मुएनचेन इंडिया यांच्याकडून केले जात आहे.माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स यांची ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया २०२६ साठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जागतिक क्रिकेट कारकिर्द, नेतृत्वगुण आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखले जाणारे डिव्हिलियर्स हे उत्कृष्टता, लवचिकता आणि प्रभावी अंमलबजावणीचे प्रतीक आहेत

### २५० ग्रामीण महिला उद्योजकांच्या डिजिटल आणि उत्पन्न क्षमता मजबूत केल्या

**पुणे :** डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी एक मजबूत पाया रचत, नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोव्हरीच्या सहकार्याने २५० ग्रामीण महिला उद्योजकांना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले, ज्यामुळे त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत अधिक सक्रियपणे सहभागी होता आले. या कार्यक्रमाचा उद्देश व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि महिलांना भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करणे हा होता. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर ब्लॉकमध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने हस्तकला, हातमाग, उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना पाठिंबा दिला, डिजिटल प्रवेशाचे मोजमाप करण्यायोग्य व्यावसायिक परिणामांमध्ये रूपांतर करण्याच्या एका केंद्रित दृष्टिकोनासह.ग्रामीण महिला उद्योजकांना त्यांच्या व्यवसायांसाठी स्मार्टफोन आणि इंटरनेटचा अर्थपूर्ण वापर करण्यास मदत करण्यासाठी हा उपक्रम डिझाइन करण्यात आला होता, जो व्यावहारिक आणि स्वतंत्र डिजिटल वापराच्या मूलभूत प्रवेशापलीकडे जाऊन आहे.

### दुष्काळग्रस्त भागांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करणार

**मुंबई:** महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या कॉर्पोरेट-केंद्रित जलसंधारण उपक्रमाला अधिक बळ देत टाटा मोटर्सने मृदा व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली आहे. या सामंजस्य करारांतर्गत २५ जिल्ह्यांमधील दुष्काळग्रस्त भागांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. हे विस्तारीकरण सहयोग-केंद्रित जल संवर्धन उपक्रमावर आधारित आहे. या उपक्रमाने आधीच वर्ष २०२५ मधील उन्हाळ्यापासून १,४५० हून अधिक जलसाठ्यांचे संवर्धन केले आहे, ज्यामुळे ३,००० कोटी लिटरहून अधिक जल साठवण क्षमता निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमधील जवळपास ७ लाख व्यक्तींना या क्षमतेचा लाभ झाला आहे.

### पोवा कर्व २ अधिकृतपणे लाँच करण्यात आला

**नवी दिल्ली :** पोवा ने नेहमीच स्मार्टफोनला ओळखीचा बॅज मानले आहे, विशेषतः धाडसी भारतीय भावनेसाठी डिझाइन केलेले. मूळ पोवाकर्व ने त्याच्या नाविन्यपूर्ण सौंदर्यशास्त्राने एक नवीन ट्रेंड सेट केला असला तरी,पोवाकर्व २ ही एक मोठी प्रगती आहे. अंतराळयान अभियांत्रिकीच्या उत्कृष्ट अचूकतेने प्रेरित होऊन, ते 'थंड' घटकाला अधिक तीक्ष्ण आणि अधिक परिष्कृत बनवते, गर्दीतून वेगळे दिसण्यासाठी तयार केलेले लाँचपॅड रेडी डिझाइन. भारताच्या सुरुवातीच्या दत्तककर्त्यांच्या अथक परिश्रमासाठी तयार केलेले, पोवाकर्व २ मोठ्या प्रमाणात न करता 'आतील शक्ती' प्रदान करते. ते रॉकसॉलिड कनेक्टिव्हिटी आणि अंतर्ज्ञानी एआय ला सेगमेंट फर्स्ट इंजिनिअरिंग वैशिष्ट्यासह एकत्रित करते: एक मोठी, उच्चसहनशक्ती बॅटरी एका अतिशय स्लिम प्रोफाइलमध्ये पॅक केली जाते! न थांबता येणारे कार्यप्रदर्शन आणि एक आकर्षक, हलके फॉर्म फॅक्टर शोधणाऱ्यांसाठी हे अंतिम पॉवरहाऊस आहे जे त्यांना कधीही मंद करत नाही.

## जैन गुरूकुलात एक लाख लिटर जलकुंभ भूमिपूजन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ फेब्रुवारी :** परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनी नियमसागर महाराज व सुपार्श्र्वसागर महाराजांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जैन गुरुकुल वेरूळ येथे प्रशालेतील भव्य अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त प्रयोगशाळा व विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय कक्षाचे यावेळी उद्घाटन करण्यात आले.



तसेच गुरुकुल मध्ये चातुर्मासानिमित्त येणाऱ्या त्यागी जणांसाठी भूमी अंतर्गत एक लाख लिटर जलकुंभ उभारण्यासाठीचे भूमिपूजन तसेच जैन आयटीआय मध्ये नवीन इलेक्ट्रिकल ट्रेड चे उद्घाटन देखील यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजी नगर येथील डॉ पीएम दरक ज्योती गंगवाल महावीर पाटणी प्रकाश गंगवाल अमोल पुणेकर सुयोग पाटोदी देवेंद्र शेठ प्रकाश पापडीवाल संस्थेचे अध्यक्ष दिनेश गंगवाल महामंत्री प्रेमचंद पाटणी कोषाध्यक्ष सुमित ठोले मार्गदर्शक वर्धमान पांडे सहमंत्री गौतम ठोले शालेय अध्यक्ष मदनलाल पांडे सदस्य निर्मल कुमार ठोले मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकुमार नवले बाल ब्र मनिष भैय्या रानु जैन यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी ११ वी १२वी महाविद्यालय कक्षाचे उद्घाटन जायंट ग्रुप ऑफ चिकलठाणा संभाजीनगर चे अध्यक्ष देवेंद्र सेठ व विष्णू राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

भूमी अंतर्गत जल कुंभाचे भूमी पूजन अमोल पुर्णेकर व सुयोग शीतलकुमार मदनलाल पाटोदि तर जैन आई टी आय चे ट्रेड उद्घाटन महावीर पाटणी,प्रकाश गंगवाल व नवीन प्रयोग शाळेचे उद्घाटन डॉ पी एम दरख व डॉ प्रकाश पापडीवाल यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी परम पूज्य नियमसागर महाराज यांचे सर्व विद्यार्थ्यांना व श्रावक श्राविका ना मांगलिक उद्बोधन करण्यात आले. अशी माहिती अतुल बादे सुहास मिश्रीकोटकर नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

## 'उजास' ग्रीन क्लॉथ पॅड युनिटला दोन वर्षे पूर्ण

### महिला सक्षमीकरणाचे प्रभावी मॉडेल



**तभा वृत्तसेवा**

**जालना, दि. १४ फेब्रुवारी :** आदित्य निराळा एज्युकेशन ट्रस्टच्या 'उजास' मासिक पाळी आरोग्य उपक्रमांतर्गत जालन्यातील ग्रीन क्लॉथ पॅड मॅन्युफॅक्चरिंग युनिटचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला. दामिनी शहरीस्थरीय संघ व जालना महानगरपालिका यांच्या सहकार्याने राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियानांतर्गत सुरू झालेल्या या प्रकल्पाचे संचालन पूर्णतः बचत गटातील महिलांकडून केले जाते.

समारंभास महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी डॉ. अशिमा मित्तल, उपआयुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

दोन वर्षांत १,११,१२५ उच्च दर्जाच्या पॅडची निर्मिती करण्यात आली असून महिलांनी दरवर्षी सुमारे १९.०४ लाख रुपयांचे एकत्रित उत्पन्न मिळवले आहे. प्रति महिला सरासरी उत्पन्न सुमारे ७६,१६० रुपये आहे.

महापौर मगरे यांनी महिला उद्योजकतेचे कौतुक केले, तर उजासच्या प्रमुख पूनम पाटकर यांनी हा मॉडेल राज्यभर विस्तारण्याचा संकल्प व्यक्त केला. महिलांच्या सन्माननीय व शाश्र्वत उपजीविकेसाठी 'उजास' कटिबद्ध असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

## आमखेडा बारी समाज अध्यक्षपद डॉ.रघुनाथ फुसे,तर उपाध्यक्षपदी गजानन ढगे यांची निवड

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१४ फेब्रुवारी :** अखिल भारतीय बारी संघाच्या वतीने सोयगाव तालुक्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून,या निवडीमुळे सोयगाव बारी समाजाच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ मिळाले आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या नेतृत्वाची ही निवड समाजाला योग्य दिशा देणारी ठरणार आहे.अखिल भारतीय बारी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेशजी घोलप व छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष रतनजी फुसे यांच्या अध्यक्षतेखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.यामध्ये आमखेडा तालुका सोयगाव बारी समाज अध्यक्षपद डॉ.रघुनाथ फुसे तर उपाध्यक्षपदी गजानन ढगे यांची निवड करण्यात आली आहे.



या नव्या नेतृत्वामुळे समाजातील प्रलंबित प्रश्र्न मार्गी लागतील,युवकांना संघटित करण्यास चालना मिळेल तसेच सामाजिक,शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी प्रभावी प्रयत्न होतील,असा विश्र्वास समाजबांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.बारी समाजाच्या एकतेला बळकटी देत समाजहिताची कामे गतिमान करण्याची मोठी जबाबदारी या पदाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.

या निवडीबद्दल सोयगाव तालुक्यातील बारी समाज बांधव, ज्येष्ठ नागरिक,युवक व मित्रमंडळी यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.समाजाच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### महाशिवरात्रीनिमित्त सनातनचे ग्रंथ प्रदर्शन

**छत्रपती संभाजीनगर :** महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित ग्रंथ व सात्त्विक वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन छत्रपती संभाजीनगर येथील खडकेश्वर महादेव मंदिर, १०८ पिंडी महादेव मंदिर, ओंकारेश्वर मंदिर, उल्कानगरी, दशमेश नगर महादेव मंदिर, जागृत हनुमान मंदिर, कामगार चौक, हनुमान मंदिर, गुलमोहर कॉलनी, सिद्धेश्वर महादेव मंदिर, मोरे चौक, बजाज नगर, महादेव मंदिर, शेंदुरवाडा, निळकंठेश्वर महादेव मंदिर, महारुद्र गल्ली बिडकीन, श्री पारदेश्वर मंदिर, पळशी रोड येथे भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## धनज खुर्द येथील पंचमुखी परमेश्वर देवस्थान: श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे केंद्र

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ फेब्रुवारी :** पंचमुखी परमेश्वर मंदिर धनज खुर्द हे नांदेड जिल्ह्यातील बिलोली मार्गावरील कहाळा येथून सुमारे पाच कि.मी. अंतरावर वसलेले जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. नवसाला पावणारे देवस्थान अशी ख्याती असलेल्या या मंदिरात वर्षभर राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. महाशिवरात्रीच्या दिवशी विशेषतः दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागतात.

मंदिरातील पंचमुखी परमेश्वराची मूर्ती ही शांत, पद्मासनस्थ, शशिधर मुकुटधारी, त्रिनेत्र आणि द्वादशहस्त अशी शास्त्रोक्त ध्यानवर्णनानुसार साकारलेली असल्याचा दावा केला जातो. उजव्या सहा हातांत शूल, वज्र, खड्ग, परशू, मृग व अभयहस्त तर डाव्या सहा हातांत नाग, पाश, घंटा, वरदहस्त, डमरू व अंकुश अशी आयुधे आहेत. मूर्तीच्या मांडीवर पार्वती विराजमान असून पंचमुखांत विष्णू, गणपती, भवानी माता, सूर्य आणि परमेश्र्वर यांचे प्रतीकात्मक दर्शन घडते.

सुमारे २०० वर्षांपूर्वी जहागिरदार घराण्याचे कुलगुरू श्री. जगन्नाथ यांना दृष्टांत झाल्यानंतर मूर्तीची स्थापना करण्यात आली. बैलगाडीचे चाक धनजजवळ निखळल्याने तेथेच प्रतिष्ठापना करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची परंपरागत आख्यायिका सांगितली जाते. स्थापनेपासून दरवर्षी महाशिवरात्रीला जहागिरदार कुटुंबीयांतर्फे रात्रभर अभिषेक, भजन, पालखी मिरवणूक आणि यात्रा आयोजित केली जाते. यात्रेदरम्यान हजारो भाविक उपस्थित राहतात. तसेच कीर्तन, प्रवचन व शिवकथा यांसह दररोज हजारो भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाते.

**- राजीव जहागिरदार**

**मंदिर अर्चक पुरोहित आयाम, देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख**

## विठ्ठल रुक्मिनी मंदिराचे भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. १४ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील गावठाण बालाजी नगर रांजणगाव रोड येथे आज दि १३ रोजी एकादशी निमित्त सरपंच अशोक धर्मे व उपसरपंच किरण गुजर यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिनी मंदिराचे बांधकाम भूमिपूजन करण्यात आले, यावेळी ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे, नंदू होले,किसन राहतवाड, गायकवाड बाबा, विनायक औचर्मल,सुरेश मोटिंगे, पांडुरंग तांबे, अशोक भवर,अन्नाल ठाणगे,गौरव गायकवाड,ओम ढगे, पत्रकार अरुण देविदास आदींची उपस्थिती होती

## मातृ-पितृ पूजनाने वातावरण भारावले

### समर्पण फाउंडेशन चा स्तुत्य उपक्रम

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१४ फेब्रुवारी**

१४ फेब्रुवारी हा दिवस जगभर व्हॅलेंटाइन-डे म्हणून साजरा होत असताना,सोयगावमध्ये मात्र समर्पण फाउंडेशन'च्या वतीने एक आगळावेगळा आणि संस्कारक्षम सोहळा पार पडला.अजंठा व्हॅली इंग्रजी स्कूलमध्ये शनिवारी (दि. १४) मातृ-पितृ पूजन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आई-वडील हेच खरे दैवत आणि गुरु आहेत,त्यांच्यावर प्रेम करा,हा संदेश या उपक्रमातून शेकडो विद्यार्थ्यांना देण्यात आला.पाश्र्चात्य संस्कृतीला भारतीय संस्कारांचा पर्याय:



दरवर्षी १४ फेब्रुवारीला पाश्र्चात्य संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो,मात्र भारतात गेल्या काही वर्षांपासून या दिवशी 'मातृ-पितृ पूजन' करण्याची नवी परंपरा रुजली आहे.संत श्री आसारामजी बापू यांनी २००७ मध्ये या उपक्रमाची सुरुवात केली होती.कुटुंबसंस्थेचे महत्त्व टिकवून ठेवणे आणि मुलांमध्ये लहानपणापासूनच नैतिक मूल्यांची रुजवणूक करणे,हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुधन्वा महाराज केनेकर,प्रमुख वक्ते म्हणून शिवव्याख्याते मोहन महाराज शेलार आणि समर्पण फाउंडेशनचे अध्यक्ष हर्षल फुसे उपस्थित होते.उपस्थित पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर म्हणाले की,आयुष्यात आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च आहे. जो व्यक्ती आई-वडिलांची सेवा करतो, त्याला यश नक्कीच मिळते.कुटुंबातील त्याग आणि आपुलकी जपण्यासाठी अशा कार्यक्रमांची आज नितांत गरज आहे.

कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे औक्षण केले. त्यांना टिळा लावून हार अर्पण केले आणि मनोभावे आशीर्वाद घेतले. आपल्या पाल्याने केलेले हे पूजन पाहून अनेक पालकांचे डोळे पाणावले होते. सुमारे दोन तास चाललेल्या या सोहळ्यात विद्यार्थी आणि पालकांमधील एक वेगळेच नाते पाहायला मिळाले. प्रत्येक शाळेत असे संस्कारक्षम कार्यक्रम व्हायला हवेत,अशी भावना उपस्थित पालकांनी या वेळी व्यक्त केली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अजंठा व्हॅली शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती पिंगाळकर, डॉ.दिनकर पिंगाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचा संपूर्ण कर्मचारी वर्ग,श्री योग वेदांत सेवा समिती सोयगाव तालुका तर्फे संजय ताडे आणि समर्पण फाउंडेशन च्या टीम मधील सागर इंगळे, संतोष औरंगे, दीपक कोरडे, यश वामने, सुदर्शन बारी, प्रणव ताडे,दीपक सोनवणे, राहूल फुसे, योगेश चव्हाण, गोपाल बावस्कर, सोपान आगे,सुरेश ढगे,स्वप्नील आगे या सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.या सर्व टीम मेंबर्सच्या अथक परिश्रमामुळेच हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

